पेजिनेशनसाठी अनुभवी व्यक्ती पाहिजे
GRAPHIC DESIGNER
Send Resume on Whatsapp
Contact : 7720046005

दैनिक
# युवावार्ता
परिवर्तनाचा पुरस्कर्ता
Web : www.yuvavarta.in/com
Mail : dailyyuvavarta@gmail.com
RNI No. MAHMAR/2007/24252
तिकीट न लावण्याचा पोष्ट परवाना : WPP - 264
पोष्टाचा परवाना क्रमांक BII/RNP/SRP/25/2023-25

विश्वास पिढ्यान् पिढ्यांचा
काळे ज्वेलर्स
सोने चांदी हिरे नवरत्न
9601222777
9615222777
बस स्टँड कॉम्प्लेक्स, संगमनेर

अहिल्यानगर । वर्ष १९ वे । अंक १६४ । किंमत - ५ रू संपादिका - सुशीला किसन हासे (बी.ए.) । संस्थापक - किसन भाऊ हासे (बी.जे.) ९८२२०३९४६० । कार्य. संपादक - सुदीप किसन हासे (एम.ई.कॉम्प.) बुधवार ०८/०७/२०२६ । पाने - ६

लग्नाचा बस्ता.. राजेन्द्रमध्ये बांधा!
मेन रोड, संगमनेर. फोन : 02425-225740, 7901031155
१९५९ पासून
विश्वासाची सार्थ परंपरा...
राजेन्द्र

## घास बाजारातील धोकादायक इमारत नगरपरिषदेने पाडली

### मोडकळीस आलेल्या इमारती तातडीने हटवा - मुख्याधिकारी

युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर - शहरातील घास बाजार परिसरातील अत्यंत जीर्ण व धोकादायक अवस्थेतील एका खाजगी इमारतीवर अखेर संगमनेर नगर परिषदेने कारवाई करत ती यंत्रसामग्रीच्या साहाय्याने निष्कासित केली. संबंधित इमारत पाडण्याबाबत मालकास वारंवार नोटिसा बजावूनही कोणतीही कार्यवाही करण्यात आली नव्हती. त्यामुळे नागरिकांच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने नगर परिषदेला ही कारवाई करावी लागली.



सदर इमारतीलगत पद्मरसिक शाह विद्यामंदिर, आदर्श विद्यामंदिर आणि दिगंबर गणेश सराफ विद्यालय या तीन शैक्षणिक संस्था असून या मार्गावर विद्यार्थ्यांसह नागरिकांची दिवसभर मोठ्या प्रमाणात वर्दळ असते. सध्या सुरू असलेल्या पावसाळ्यात इमारत कोसळून मोठी जीवितहानी होण्याची शक्यता लक्षात घेऊन नगर परिषदेने ३ जुलै रोजी तातडीने ही धोकादायक इमारत जमीनदोस्त केली. या कारवाईवेळी मुख्याधिकारी दयानंद गोरे, नगर परिषदेचे अभियंता महेश गोरडे, अभियंता पंकज मुंगसे तसेच बांधकाम विभागाचे अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते. दरम्यान, शहरातील ज्या मालमत्ताधारकांना धोकादायक इमारतींबाबत नोटिसा बजावण्यात आल्या आहेत किंवा

(पान २ वर)

## जनतेच्या जीवाशी खेळणाऱ्या भेसळखोरांवर घाव

### अन्न व औषध प्रशासनातील भ्रष्टाचारावरही प्रश्नचिन्ह



**जीवघेण्या भेसळीच्या गोरखधंद्यात केवळ छोटे-मोठे भेसळखोर सहभागी नाहीत तर नामांकित अशा संस्था की, ज्यांच्यावर ग्राहक डोळे झाकून विश्वास ठेवतो. अशा संस्थादेखील या गोरख धंद्यात सहभागी असल्याचे छापेमारीत समोर आले आहे. केवळ नफेखोरी करण्यासाठी नागरिकांच्या जीवाशी खेळले जात आहे. ज्या दुधाला देशात मागणी आहे, नागरिकांचा त्यांच्यावर विश्वास आहे. अशा नामांकित संस्था देखील भेसळखोरी करत असेल तर नागरिकांनी नेमका कुणावर विश्वास ठेवावा आणि आपल्या आरोग्याची काळजी नेमकी कशी घ्यावी असा प्रश्न निर्माण झाला आहे.**

युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर - राज्यातील दूध व दुग्धजन्य पदार्थांमध्ये होणाऱ्या भेसळीविरोधात अन्न व औषध प्रशासनाने अलीकडेच सुरू केलेल्या धडक कारवाईमुळे जनतेसमोर अत्यंत धक्कादायक वास्तव आले आहे. अन्न व औषध प्रशासनाचे आयुक्त तुकाराम मुंडे यांच्या नेतृत्वाखाली राज्यभर सुरू असलेल्या कारवाईत कृत्रिम दूध, बनावट दुग्धजन्य पदार्थ आणि भेसळयुक्त अन्नपदार्थांचे अनेक प्रकार उघडकीस आले आहेत. या कारवाईमुळे जनतेच्या आरोग्याशी खेळणाऱ्या भेसळखोरांचे धाबे दणाणले असले, तरी यापूर्वी इतक्या मोठ्या प्रमाणावर सुरू असलेली भेसळ संबंधित यंत्रणांच्या नजरेतून कशी सुटली?, असा गंभीर प्रश्न उपस्थित होत आहे.

आरोग्यतज्ज्ञांच्या मते, दूध व दुग्धजन्य पदार्थांमधील भेसळ ही सर्वाधिक धोकादायक मानली जाते. कृत्रिम दूध, रसायनांचा वापर करून तयार केलेले दुग्धजन्य पदार्थ तसेच निकृष्ट दर्जाचे खाद्यपदार्थ यामुळे कर्करोगासह अनेक गंभीर आजारांचा धोका वाढतो. लहान मुले, ज्येष्ठ नागरिक आणि रुग्ण यांच्यावर अशा भेसळयुक्त अन्नाचा सर्वाधिक विपरीत परिणाम होत असल्याचे तज्ज्ञांचे मत आहे.

विशेष म्हणजे, राज्यात प्रत्यक्ष उत्पादन होणाऱ्या दुधापेक्षा बाजारात विक्री होणाऱ्या दुधाचे प्रमाण अधिक असल्याची बाब यापूर्वीही अनेकदा समोर आली होती. त्यामुळे मोठ्या प्रमाणावर कृत्रिम दूध तयार करून त्याची विक्री केली जात असल्याची शक्यता व्यक्त केली जात होती. आता अन्न व औषध प्रशासनाच्या कारवाईत अशा प्रकारच्या रॅकेटचा पर्दाफाश होत असल्याने या संशयाला अधिक बळ मिळाले आहे.

या कारवाईनंतर सर्वसामान्य नागरिकांमध्ये एक महत्त्वाचा प्रश्न चर्चिला जात आहे. दूध, तेल, मसाले, धान्य आणि इतर अन्नपदार्थांमध्ये अनेक वर्षांपासून भेसळ सुरू असताना संबंधित अधिकारी नेमके काय करत होते? जर एवढ्या मोठ्या प्रमाणावर गैरप्रकार सुरू होते, तर त्याकडे दुर्लक्ष झाले की जाणीवपूर्वक डोळेझाक करण्यात आली, अशी चर्चा आता सर्वसामान्यांमध्ये सुरू झाली आहे. याच पार्श्वभूमीवर अन्न व औषध प्रशासनातील भ्रष्टाचाराचाही मुद्दा ऐरणीवर आला आहे.

## समनापूरच्या अनेक तरुणांचा शिवसेनेत प्रवेश



**समनापूर येथील बाळूमामा भक्त मंडळाच्या तरुणांनी गावात बाळू मामांच्या नावाने भव्य स्वागत कमान उभारण्याची मागणी आमदार अमोल खताळ यांच्याकडे केली. त्यांच्या या मागणीची दखल घेत आ. खताळ यांनी सकारात्मक प्रतिसाद देत, बाळूमामा हे लाखो भाविकांचे श्रद्धास्थान असून त्यांच्या नावाने समनापूर येथे कमान उभारण्यासाठी शासनदरबारी आवश्यक तो पाठपुरावा करून सर्वतोपरी प्रयत्न केले जातील. गावाच्या धार्मिक आणि सांस्कृतिक वैभवात भर घालणाऱ्या या मागणीची निश्चितच पूर्तता करण्या साठी आपण कटिबद्ध आहोत.**

**आ. अमोल खताळ, संगमनेर**


युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर -संगमनेर तालुक्यातील समनापूर येथील बाळूमामा भक्त मंडळातील २५ ते ३० तरुणांनी आ. अमोल खताळ यांच्या प्रमुख उपस्थितीत शिवसेनेत जाहीर प्रवेश केला. या प्रवेशामुळे समनापूर परिसरात शिवसेनेचे संघटन अधिक मजबूत झाले असून, तालुक्यात आ. अमोल खताळ यांच्या नेतृत्वाला दिवसेंदिवस वाढता प्रतिसाद मिळत असल्याचे चित्र दिसून येत आहे.

मतदारसंघात सुरू असलेल्या विविध विकासकामांवर विश्वास व्यक्त करत या तरुणांनी शिवसेनेत प्रवेश करण्याचा निर्णय घेतला. यावेळी सोपान चांडे, विशाल चांडे, सुनील चांडे, साई चांडे, भाऊसाहेब चांडे, आकाश चांडे, ओंकार पोलगर, शुभम चांडे, सार्थक शेरमाळे, संदीप वैद्य, सचिन चांडे, अमोल गेठे, जुम्मा शेख, मोठ्याबापू शेरमाळे, मीरा शेख, पांडू देवकाते, प्रणय शेरमाळे, रावसाहेब शेरमाळे, संजय उदमले यांच्यासह २५ ते ३० तरुणांनी शिवसेनेत जाहीर प्रवेश केला. यावेळी शिवसेनेचे ज्येष्ठ नेते म्हतु शेरमाळे, युवासेना उपजिल्हा प्रमुख सौरभ देशमुख, शिवसेना उपजिल्हा प्रमुख रमेश काळे, उपतालुकाप्रमुख रणजीत जाधव, मच्छिंद्र शेरमाळे, युवासेना सचिव एकनाथ शेरमाळे, समन्वयक सुनील चांडे, शाखाप्रमुख अब्बू इनामदार, संदीप शेरमाळे, मनोज भास्कर, राजेश शेरमाळे, संपत गेठे, रावसाहेब शेरमाळे, अमोल शेरमाळे, राजेंद्र गायकवाड, राहुल पोकळे यांच्यासह शिवसैनिक, पदाधिकारी व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

प्रवेशानंतर आ. खताळ यांनी नव्याने पक्षात दाखल झालेल्या तरुणांचे स्वागत करत शिवसेनेच्या माध्यमातून सर्वसामान्यांच्या प्रश्नांना न्याय देण्यासाठी तसेच गावाच्या विकासासाठी कटिबद्ध असल्याची ग्वाही दिली. तसेच विकास कामांच्या माध्यमातून जनतेचा विश्वास संपादन करण्याचे काम पुढेही सुरू राहील, असे त्यांनी सांगितले.

## श्रीज्ञानेश्वर मंदिर संगमनेर येथे
## श्री ज्ञानेश्वरी ग्रंथाचे निरूपण



संगमनेर मधील प्रसिद्ध श्री ज्ञानेश्वर मंदिरात श्री ज्ञानेश्वरी ग्रंथाचे निरूपण बुधवार दिनांक ८ जुलै २०२६ रोजी सायंकाळी ६ वाजता होणार आहे.

**प्रसिद्ध श्रीज्ञानेश्वरी निरूपणकार**

**ह.भ.प. अरुण महाराज फरगडे**

यांचे अमृतमय वाणीतून प्रसारित होणाऱ्या या निरूपणाचा लाभ श्री ज्ञानेश्वरी साधकांनी घ्यावा असे आवाहन श्री ज्ञानेश्वर मंदिराचे विश्वस्त रमेश काका सराफ व परिवाराने केले आहे.

**बुधवार दि. ८/७/२०२६ रोजी सायं. ६.०० वाजता**

ॲडव्हान्स गोल्ड एस.आय.पी. योजना
२०२६-२७
आजची छोटी बचत... उद्याची मोठी सोन्याची खरेदी!
आताच गोल्ड एस.आय.पी. सुरू करा आणि २०२७ च्या
अक्षयतृतीयेला आपल्या आवडीचे
दागिने घरी न्या.
: उपलब्ध योजना :
मजुरी फ्री / एक्स्ट्रा बोनस एस.आय.पी.
फिक्स भाव बुकिंग एस.आय.पी.
फ्लेक्झिबल भाव बुकिंग एस.आय.पी.
SIP ऑनलाईन सुविधा उपलब्ध.
सोने । चांदी । हिरे
अशोक चौक, संगमनेर
फोन : 02425-225924
मो : 9372012044
ओममयूर ज्वेलर्स
आपुलकीने यावे विश्वासाने न्यावे

विश्वसनीय वस्त्रांची अखंड परंपरा
राजपाल
आला रे आला राजपाल सेल आला..!
30 ते 70% डिस्काउंट सेल
जुने दिपाली फर्निचर, बस स्टँड समोर, नारायणगाव
संगमनेर (02425) 222226 | अ.नगर (0241) 2999299 | नारायणगाव (02132) 242132

मे.पोपट भगिरथ महाले ज्वेलर्स (सराफ)
भव्य मंगळसूत्र महोत्सव
फक्त आपल्या लाडक्या PBM ज्वेलर्स मध्ये
यामध्ये नवनवीन डिझाईन् आणि
व्हरायटीचे मंगळसूत्र त्याच प्रमाणे
जुन्या 22 कॅरेट सोन्याच्या
एक्सचेंज वर 0% घट
अशोक चौक, गुंडेचा हॉस्पिटल समोर,चावडी जवळ, संगमनेर
7599996999/ 8265036807

Km HOSPITAL
विश्वसनीय उपचारांची परंपरा
अत्याधुनिक वैद्यकीय सेवा
माफक दरात - संगमनेर येथेच
105 बेड्स
तज्ञ डॉक्टर्स
अत्याधुनिक सुविधा
कॅशलेस सुविधा किंवा मेडिक्लेम सुविधा उपलब्ध
हृदय विकार, समर्पित स्त्रीरोग विभाग, अस्थिरोग, अपघात विभाग, मूत्रविकार, सांधे प्रत्यारोपण शस्त्रक्रिया, मेंदू व मणके विकार शस्त्रक्रिया, लॅपरोस्कोपिक सर्जरी, गुदविकार उपचार व शस्त्रक्रिया, जनरल मेडिसिन, छातीचे विकार, पॅरालीसीस मधुमेह विकार, एंडोस्कोपिक स्पाइन सर्जरी, रोबोटिक सर्जरी, गुदविकार विभाग, अत्याधुनिक कॅथ लॅब, मॉड्युलर ऑपरेशन थिएटर- डायलिसिस प्लास्टिक सर्जरी सिटी स्कॅन, सोनोग्राफी विभाग
सर्व वैद्यकीय सेवा एकाच छताखाली 02425 - 226532/33
पत्ता - सदाशंकर नगर, पोफळे मळा, बी.एड. कॉलेज जवळ, अकोले बायपास रोड, संगमनेर
एकत्रित आयुष्यमान भारत-प्रधानमंत्री जन आरोग्य योजना व महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य योजना
9953299532
आजच संपर्क करा
24/7 Emergency Services

# पावसाळ्यातील विजेच्या धोक्यांकडे दुर्लक्ष

# निष्पाप जीवांचा बळी, जबाबदार कोण?




युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर - पावसाळ्याच्या दिवसांत विजेचे खांब, उघडी वीज रोहित्रे (डीपी), लोंबकळणाऱ्या तारा आणि विद्युत यंत्रणांची नियमित तपासणी व सुरक्षिततेचे ऑडिट करणे ही संबंधित प्रशासन आणि महावितरणची मूलभूत जबाबदारी असते. मात्र या जबाबदारीकडे होणाऱ्या दुर्लक्षामुळे दरवर्षी अनेक दुर्घटना घडत असून निष्पाप नागरिकांना आपला जीव गमवावा लागत आहे. त्यामुळे वेळीच तपासणी आणि दुरुस्ती होत असताना अशा घटना घडतातच कशा? असा संतप्त सवाल नागरिकांकडून उपस्थित केला जात आहे.

पावसाळ्यापूर्वी आपत्ती व्यवस्थापनाच्या अनुषंगाने विविध विभागांकडून धोकादायक ठरू शकणाऱ्या ठिकाणांची पाहणी करून आवश्यक दुरुस्ती केली जाते. कमजोर घरे, धोकादायक झाडे, गटारी, विजेचे खांब, लोंबकळणाऱ्या तारा, रस्त्यांवरील खड्डे आदी बाबींची डागडुजी करण्याचे नियोजन असते. मात्र काही ठिकाणी निष्काळजीपणा आणि कामचुकारपणामुळे ही कामे केवळ कागदोपत्रीच राहतात. त्याचा परिणाम नागरिकांच्या जीवितावर होऊ शकतो.

अनेक ठिकाणी महावितरणची वीज रोहित्रे उघडी असल्याचे दिसून येते. पावसाच्या पाण्यामुळे वीज खांबांमध्ये किंवा रोहित्रांमध्ये करंट उतरून गंभीर अपघात होण्याची शक्यता निर्माण होते. विशेषत: आजूबाजूला खेळणारी लहान मुले, रस्त्यावर फिरणारे नागरिक आणि मुकी जनावरे यांना याचा मोठा धोका असतो. याच निष्काळजीपणाचे भीषण उदाहरण नुकतेच अहिल्यानगर शहरातील आनंदनगर येथे समोर आले. विजेच्या खांबाला करंट लागल्याने अवघ्या साडेतीन वर्षांच्या निष्पाप चिमुकलीचा दुर्दैवी मृत्यू झाला. खेळण्या-बागडण्याच्या वयात एका कोवळ्या जीवाला अशा प्रकारे जीव गमवावा लागणे ही अत्यंत हृदयद्रावक आणि संतापजनक घटना आहे. या घटनेमुळे महावितरणच्या सुरक्षितता उपाययोजनांवर आणि संबंधित यंत्रणांच्या कार्यपद्धतीवर गंभीर प्रश्नचिन्ह उपस्थित झाले आहे.

पावसाळा सुरू झाल्याने नागरिकांनीही अधिक सतर्क राहणे आवश्यक आहे. रस्त्यावरून ये-जा करताना, पाण्याने वेढलेले वीज खांब, उघडी डीपी, तुटलेल्या किंवा लोंबकळणाऱ्या तारा आढळल्यास तत्काळ संबंधित विभागाला माहिती द्यावी.

तसेच लहान मुलांवर विशेष लक्ष ठेवावे, असे आवाहन करण्यात येत आहे. नागरिकांच्या सुरक्षिततेसाठी महावितरण व प्रशासनाने तातडीने सर्व वीज यंत्रणांचे सर्वेक्षण करून धोकादायक ठिकाणी आवश्यक दुरुस्ती करणे गरजेचे आहे. अन्यथा निष्काळजीपणामुळे आणखी किती निष्पाप जीवांचा बळी जाणार, हा प्रश्न अनुत्तरितच राहणार आहे.

# डॉ. सुनील दिघेंनी आधुनिक तंत्रज्ञानाची दूरदृष्टी दाखविली - ना. विखे पाटील

## दिघे मल्टीस्पेशालिटी हॉस्पिटल रुग्ण सेवेत दाखल



युवावार्ता (प्रतिनिधी)

मोठ्या जिद्दीने आणि अथक परिश्रमातून डॉ. सुनील दिघे यांनी वैद्यकीय प्रवास पूर्ण केला आहे. जिल्ह्यातील अत्यंत आधुनिक कॅथलॅब उभारून त्यांनी वैद्यकीय क्षेत्रातील आधुनिक तंत्रज्ञान स्वीकारण्याची दूरदृष्टी दाखविली आहे. ग्रामीण भागातील रुग्णांना महानगरांप्रमाणे दर्जेदार उपचार सुविधा उपलब्ध करून देण्याच्या दिशेने हे मोठे पाऊल आहे असे गौरवाद्गार जलसंपदा तथा पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी काढले.

संगमनेर शहराच्या आरोग्य क्षेत्रात मोलाची भर ठरणाऱ्या दिघे मल्टीस्पेशालिटी - हॉस्पिटलचे उद्घाटन रविवारी (दि. ५) उत्साहपूर्ण वातावरणात पार पडले. पालकमंत्री विखे पाटील यांच्या हस्ते फित कापून व दीपप्रज्वलन करून उद्घाटन करण्यात आले. यावेळी माजी मंत्री बाळासाहेब थोरात, आमदार अमोल खताळ, डॉ. राजेंद्र विखे पाटील, ध्रुव राजेंद्र विखे, कपिल कचकुरे, बाळासाहेब शिंदे यांच्यासह परिसरातील नामवंत डॉक्टर, विविध क्षेत्रांतील मान्यवर, सामाजिक कार्यकर्ते तसेच नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

उद्घाटनानंतर उपस्थित मान्यवरांनी हॉस्पिटलमधील विविध विभागांची पाहणी केली. अत्याधुनिक वैद्यकीय उपकरणे, सुसज्ज ऑपरेशन थिएटर, आधुनिक कॅथलॅब, तज्ज्ञ रुग्णकेंद्री सेवा याबाबत त्यांनी समाधान व्यक्त केले. आधुनिक वैद्यकीय सुविधांमुळे हृदयरोगासह विविध गंभीर आजारांवरील उपचार आता संगमनेरमध्येच उपलब्ध होणार असल्याचे सांगण्यात आले. या हॉस्पिटलमुळे संगमनेरसह तालुक्यातील आणि परिसरातील, हजारो रुग्णांना दर्जेदार आरोग्य सेवा स्थानिक पातळीवर मिळणार आहे. नाशिक किंवा अन्य शहरांकडे धाव घेण्याची गरज मोठ्या प्रमाणात कमी होणार असून वेळ, पैसा आणि श्रम यांचीही बचत होईल, अशी भावना उपस्थित मान्यवरांनी व्यक्त केली. हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी डॉ. प्रतिभा दिघे, जोर्वे गावचे माजी सरपंच गोकुळ दिघे, दिघे परिवार व हॉस्पिटलच्या सहकाऱ्यांनी विशेष परिश्रम घेतले.

# जयहिंद वारकरी सेवाभावी मंडळाची संगमनेर ते पंढरपूर दिंडी

युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर - वारकरी सेवाभावी मंडळ व सहकार महर्षी भाऊसाहेब थोरात वारकरी मंच आणि जय हिंद युवामंच संगमनेर संचालित श्री सोमेश्वर पायी दिंडी सोहळा रंगार गल्ली, संगमनेर ते श्री क्षेत्र पंढरपूर असे आयोजन करण्यात आली असल्याची माहिती दिंडी मार्गदर्शक ह. भ. प. कल्याण महाराज पवार यांनी दिली आहे.

याबाबत पुढे ते म्हणाले की, संगमनेर तालुका हा सुसंस्कृत आणि धार्मिक विचारांचा तालुका आहे. लोकनेते बाळासाहेब थोरात व माजी आमदार डॉ. सुधीर तांबे, आमदार सत्यजित तांबे, सौ. दुर्गाताई तांबे, डॉ जयश्रीताई थोरात व नगराध्यक्ष डॉ. मैथिलीताई तांबे यांच्या मार्गदर्शनाखाली जय हिंद युवा मंचच्यावतीने हीच आध्यात्मिक परंपरा जपत वारकरी सेवाभावी मंडळ व सहकार महर्षी भाऊसाहेब थोरात वारकरी मंच आणि सोमेश्वर पायी दिंडी सोहळा, संगमनेर येथून श्री क्षेत्र पंढरपूर येथे दिंडी सोहळा आयोजित करण्यात आला आहे.

ही दिंडी बुधवार दिनांक ८ जुलै २०२६ रोजी नियोजित ठिकाणाहून मार्गस्थ होणार आहे. त्याचप्रमाणे रविवार दिनांक २६ जुलै२०२६ पर्यंत ही दिंडी असणार आहे. दिंडीचा शेवटचा विश्राम हा तिरंगा नगर वखारी रोड (शोभाताई सावकारे यांचे निवासस्थान) पंढरपूर येथे होणार आहे. तरी या पायी दिंडीत तालुक्यातील, विविध गावातील नागरिकांनी सहभागी व्हावे असे आवाहन आयोजकांच्या वतीने दिंडी आयोजक ह. भ.प. दादाजी महाराज शिल्लक, ह.भ.प. कल्याण पवार, ह.भ.प. जालिंदर ढोकरट यांच्यावतीने करण्यात आले आहे.

# पान १ वरून - जनतेच्या जीवाशी खेळणाऱ्या...

काही भ्रष्ट अधिकारी आणि भेसळखोर यांच्यातील साटेलोटे असल्याशिवाय इतक्या मोठ्या प्रमाणावर हा काळाबाजार सुरू राहू शकत नाही, अशी भावना नागरिक व्यक्त करत आहेत. अशा गैरप्रकारांना राजकीय संरक्षण मिळत असल्याचा आरोपही विविध स्तरांतून होत असून, या संपूर्ण प्रकरणाची सखोल चौकशी करण्याची मागणी जोर धरत आहे. आयुक्त तुकाराम मुंडे यांनी कठोर आणि पारदर्शक प्रशासनाची भूमिका घेत भेसळखोरांविरोधात सुरू केलेल्या मोहिमेचे विविध स्तरांतून स्वागत होत आहे. त्यांच्या नेतृत्वाखाली दोषींवर गुन्हे दाखल करण्याबरोबरच भेसळयुक्त अन्नपदार्थ जप्त करण्याची मोहीम वेगाने सुरू आहे. त्यामुळे अनेक वर्षांपासून जनतेच्या जीवाशी खेळणाऱ्या टोळ्यांचे जाळे उघड होऊ लागले आहे. सामाजिक कार्यकर्त्यांच्या मते, केवळ सरकारी यंत्रणांच्या कारवाईवर अवलंबून राहून भेसळ पूर्णपणे थांबविणे शक्य नाही. त्यासाठी नागरिकांचाही सक्रिय सहभाग आवश्यक आहे. आपल्या परिसरात भेसळयुक्त अन्नपदार्थांची विक्री होत असल्याची माहिती गुप्तपणे अन्न व औषध प्रशासनाला दिल्यास दोषींवर तातडीने कारवाई होऊ शकते. त्यामुळे सुजाण नागरिक, युवक, स्वयंसेवी संस्था आणि सामाजिक कार्यकर्त्यांनी पुढाकार घेऊन अशा गैरप्रकारांविरोधात माहिती देणे ही काळाची गरज असल्याचे मत व्यक्त केले जात आहे. एकीकडे व्यसनाधीनता, बदलती जीवनशैली आणि प्रदूषणामुळे नागरिकांच्या आरोग्यावर संकट निर्माण झाले असताना दुसरीकडे अन्नातील भेसळ हे आणखी मोठे आव्हान बनले आहे. जनतेच्या ताटात विष पोहोचविणाऱ्या भेसळखोरांविरोधात कठोर कारवाईबरोबरच अन्न व औषध प्रशासनातील भ्रष्टाचारालाही आळा घालण्याची गरज निर्माण झाली आहे. दोषींवर कठोर शिक्षा, पारदर्शक यंत्रणा आणि जागरूक नागरिकांचा सहभाग यांच्याच माध्यमातून भेसळमुक्त महाराष्ट्राचे उद्दिष्ट साध्य होऊ शकते, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

# घास बाजारातील धोकादायक...

ज्यांच्या इमारती व घरे मोडकळीस येऊन धोकादायक अवस्थेत आहेत, त्यांनी स्वत:हून तातडीने त्या निष्कासित करून घ्याव्यात, असे आवाहन मुख्याधिकारी दयानंद गोरे यांनी केले आहे.

विहित मुदतीत कार्यवाही न करणाऱ्या मालमत्ताधारकांविरुद्ध नगर परिषद स्वत: यंत्रसामग्रीच्या सहाय्याने कारवाई करेल. त्यासाठी होणारा संपूर्ण खर्च संबंधित मालमत्ताधारकांकडून वसूल करण्यात येणार असल्याचा इशाराही प्रशासनाने दिला आहे. संभाव्य दुर्घटना टाळण्यासाठी आणि नागरिकांच्या जीविताचे संरक्षण करण्यासाठी सर्वांनी प्रशासनाला सहकार्य करावे, असे आवाहनही नगर परिषदेने केले आहे.

# नात्यांचा मुखवटा आणि गुन्हेगारीचे वास्तव !



नातेसंबंध हे विश्वास, प्रेम, समजूतदारपणा आणि परस्पर आदराच्या पायावर उभे असतात. परंतु अलीकडील काही घटनांनी या नात्यांमधील वाढती असुरक्षितता आणि भावनिक विघटन पुन्हा एकदा समोर आणले आहे. एका प्रकरणात एका तरुणीने आपल्या होणाऱ्या पतीची प्रेमाच्या नावाखाली हत्या केली, तर दुसऱ्या प्रकरणात एका नवविवाहितेच्या संशयास्पद मृत्यूमुळे हुंडा, मानसिक छळ आणि कौटुंबिक अत्याचार यांसारखे गंभीर प्रश्न पुन्हा चर्चेत आले. या दोन्ही घटनांचा विचार करताना पुरुष किंवा महिला अशा चौकटीत अडकून न पडता, त्यामागील मानसिकता समजून घेणे अधिक महत्त्वाचे ठरते. कारण गुन्हेगारीला कोणतेही लिंग नसते; गुन्हा हा विकृत विचारसरणीचा परिणाम असतो.

आज समाजात कोणतीही धक्कादायक घटना घडली की तिच्याकडे स्त्री-पुरुष संघर्षाच्या नजरेतून पाहण्याची घाई होते. मात्र प्रत्येक पुरुष अत्याचारी असतो किंवा प्रत्येक महिला निष्पाप असते, असे गृहीत धरणे धोकादायक आहे. लोभ, सूड, स्वार्थ, फसवणूक, नियंत्रणाची प्रवृत्ती आणि क्रौर्य या मानवी दुर्बलता आहेत. त्या कोणत्याही व्यक्तीमध्ये असू शकतात. त्यामुळे व्यक्तीच्या लिंगावर नव्हे, तर तिच्या वर्तनावर आणि मानसिकतेवर चर्चा होणे गरजेचे आहे.

आज अनेक नातेसंबंध संवादाच्या अभावामुळे नव्हे, तर भावनिक अपरिपक्वतेमुळे तुटताना दिसतात. रागावर नियंत्रण ठेवता न येणे, नकार स्वीकारता न येणे, संशयाची सवय, अतिरेकी अपेक्षा आणि प्रत्येक गोष्ट स्वत:च्या नियंत्रणात ठेवण्याची मानसिकता यामुळे नात्यांमध्ये तणाव वाढतो. अशा परिस्थितीत प्रेमाचे नाते हळूहळू मानसिक छळ, भावनिक शोषण आणि कधी कधी गंभीर गुन्ह्यांपर्यंत पोहोचते.

भावनिक शोषण हीदेखील हिंसेचीच एक धोकादायक बाजू आहे. सतत अपमान करणे, जोडीदाराला अपराधी वाटायला लावणे, त्याच्या निर्णयांवर नियंत्रण ठेवणे, मित्र-नातेवाईकांपासून दूर करणे किंवा प्रेमाचा वापर दबावाचे साधन म्हणून करणे ही त्याची काही रूपे आहेत. अशा नात्यांमध्ये पीडित व्यक्ती हळूहळू आत्मविश्वास गमावते आणि मानसिकदृष्ट्या खचत जाते. त्यामुळे अशा विषारी नात्यांची लक्षणे वेळेत ओळखणे अत्यंत आवश्यक आहे.

या परिस्थितीमागे एक मोठी सामाजिक उणीवही आहे. आपण मुलांना चांगले शिक्षण, करिअर आणि आर्थिक यश मिळवण्यासाठी प्रोत्साहन देतो; पण भावना समजून घेणे, मतभेद शांतपणे सोडवणे, अपयश स्वीकारणे, नकार पचवणे आणि दुसऱ्याचा आदर करणे ही जीवनातील महत्त्वाची कौशल्ये शिकवत नाही. परिणामी, अनेक सुशिक्षित आणि यशस्वी व्यक्तीदेखील भावनिकदृष्ट्या अपरिपक्व राहतात. अशा अपरिपक्वतेतूनच अनेकदा चुकीचे निर्णय आणि टोकाची पावले उचलली जातात.

कुटुंब आणि शाळांची जबाबदारी येथे अत्यंत महत्त्वाची ठरते. मुलगा असो किंवा मुलगी, दोघांनाही भावनिक शिक्षण, संवादकौशल्य, सहानुभूती आणि आत्मसंयम यांचे संस्कार मिळाले पाहिजेत. केवळ गुण, पैसा किंवा करिअर यशस्वी आयुष्याची हमी देत नाहीत. नातेसंबंध टिकवण्यासाठी भावनिक बुद्धिमत्ता तितकीच आवश्यक आहे.

समाजानेही अशा घटनांवर प्रतिक्रिया देताना संयम बाळगला पाहिजे. सोशल मीडियावरील अपूर्ण माहितीच्या आधारावर संपूर्ण स्त्री किंवा पुरुष समाजाला दोष देण्यापेक्षा प्रत्येक प्रकरणाची निष्पक्ष चौकशी आणि सत्याचा शोध महत्त्वाचा आहे. गुन्हेगाराला त्याच्या लिंगामुळे नव्हे, तर गुन्ह्यामुळे शिक्षा झाली पाहिजे आणि पीडिताला न्याय मिळाला पाहिजे.

नातेसंबंध हे विश्वासावर उभे राहतात आणि संशय, स्वार्थ किंवा नियंत्रणाच्या मानसिकतेमुळे कोसळतात. त्यामुळे आजची खरी गरज केवळ कठोर कायद्यांची नाही, तर भावनिकदृष्ट्या सक्षम समाज घडवण्याची आहे. प्रेम, आदर, संवाद आणि संवेदनशीलता हीच निरोगी नात्यांची खरी ओळख आहे. गुन्हेगारीला लिंग नसते; ती विकृत मानसिकतेतून जन्माला येते. म्हणूनच पुढील पिढीला केवळ यशस्वी नव्हे, तर भावनिकदृष्ट्या परिपक्व आणि जबाबदार नागरिक बनवणे, हीच काळाची सर्वात मोठी गरज आहे.

# जिल्हा नियोजन समितीवर शिवसेनेचे घोरपडे



युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर - शिवसेनेचे जिल्हा संघटक विठ्ठल विठ्ठल रावसाहेब घोरपडे यांची जिल्हा नियोजन समितीवर विशेष निमंत्रित सदस्य म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे.

शिवसेनेचे जिल्हा संघटक म्हणून कार्यरत असलेले विठ्ठल घोरपडे यांनी उपमुख्यमंत्री व शिवसेना पक्षाचे मुख्य नेते एकनाथ शिंदे, पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील व आमदार अमोल खताळ यांच्या मार्गदर्शनाखाली पक्ष संघटन बांधणी बरोबरच विविध जन हिताच्या प्रश्नांवर सातत्याने काम केले आहे. त्यांनी विशेषत:निळवंडे पाटपाणी योजनेच्या लढ्यामध्ये गेली १५ वर्षांपासून लढा दिला आहे. तळेगाव निमोण सारख्या दुष्काळग्रस्त भागाला पाणी मिळावे आणि या भागातील पाणी टंचाई दूर व्हावी तसेच ग्रामीण भागातील विकासकामांना गती मिळावी यासाठी त्यांनी सातत्याने पाठपुरावा केला आहे. त्यांच्या या कार्याची दखल घेत जिल्हा नियोजन समितीच्या सदस्यपदी त्यांची निवड केली आहे. त्यांच्या निवडीबद्दल सर्व स्तरातून त्यांचे अभिनंदन होत आहे.

# नाशिकवरील ढगफुटीचे संकट टळले

नाशिक (प्रतिनिधी)

नाशिककरांसाठी एक दिलासादायक बातमी आहे. हवामान खात्याने नाशिक शहर आणि त्र्यंबकेश्वर परिसरात तब्बल ३५० मिलीमीटर पावसाचा, म्हणजेच 'ढगफुटी'चा धडकी भरवणारा इशारा दिला होता. मात्र, पालघरमध्ये हाहाकार उडवणारा पावसाचा 'भोवरा' ऐनवेळी नाशिकच्या वेशीवरून दुसरीकडे वळल्याने शहरावरील अतिवृष्टीचे संकट टळले आहे. असे असले तरी, इगतपुरी आणि त्र्यंबकेश्वरसारख्या घाटमाथ्यांवर अद्यापही पावसाचा जोर कायम आहे. या पावसामुळे नाशिकला पाणीपुरवठा करणाऱ्या धरणांच्या पाणीसाठ्यात अत्यंत वेगाने आणि समाधानकारक वाढ होत आहे.

पालघर जिल्ह्यात तब्बल ४५० मिमी पावसाची नोंद करणारा हवामानातील तोच 'भोवरा' सोमवारी रात्री त्र्यंबकेश्वर-नाशिक मार्गे सरकण्याचा अंदाज हवामान खात्याने वर्तवला होता. यामुळे नाशिकमध्ये हाय अलर्ट जारी करण्यात आला होता. सोमवारी रात्रभर पावसाने शहरात जोरदार हजेरीही लावली. मात्र, मंगळवारी सकाळी हवामानाच्या स्थितीत मोठा बदल झाला. हा भोवरा नाशिककडे न येता उत्तरेकडे गुजरातच्या सुरतच्या दिशेने आणि दक्षिणेकडे अहिल्यानगर जिल्ह्यातील अकोले परिसराकडे सरकला आहे. यामुळे नाशिक आणि त्र्यंबकेश्वरवरील ढगफुटीचा धोका बऱ्याच अंशी कमी झाला आहे.राज्यातील अनेक भागांमध्ये पावसाची संततधार सुरूच असून हवामान विभागाने आज अहिल्यानगर, छत्रपती संभाजीनगर, बीड, परभणी, जालना, सातारा आणि सोलापूर जिल्ह्यांत मध्यम स्वरूपाच्या पावसाचा अंदाज वर्तवला आहे.

शहरावरील संकट टळले असले तरी, आणि मंगळवारी सकाळी नाशिक शहरात पावसाने थोडी विश्रांती घेतली असली तरी घाटमाथ्यावरील परिस्थिती अद्यापही गंभीर आहे. इगतपुरी, कसारा आणि त्र्यंबकेश्वर भागात मुसळधार पाऊस कोसळत आहे.

# नेहरू चौकातील गटारकामाच्या संथ गतीमुळे नागरिक त्रस्त



संगमनेर (प्रतिनिधी)

संगमनेर शहरातील भाजी बाजार परिसरातील नेहरू चौक-नारळ गल्ली येथे नगरपालिकेच्या वतीने गटारीचे काम सुरू असून, गेल्या १० ते १५ दिवसांपासून हे काम अत्यंत संथ गतीने सुरू आहे. त्यामुळे परिसरातील दुकानदार, ग्राहक आणि नागरिकांना मोठ्या गैरसोयींचा सामना करावा लागत आहे. खोदकामामुळे वाहतुकीस अडथळा निर्माण होत असून व्यावसायिकांचेही नुकसान होत आहे. संबंधित काम तातडीने पूर्ण करून नागरिकांची गैरसोय दूर करावी, अशी मागणी परिसरातील व्यापारी व नागरिकांकडून करण्यात येत आहे.

संगमनेरकरांनी गौरविलेले
।।जय श्रीराम।।
सुपर शॉपी
निवडक किराणा, ड्रायफुट, कॉस्मेटिक
जीवन ज्योती, गणेशनगर, संगमनेर
एस. आर. थोरात दुध व बाय प्रोडक्टस्
प्रोप्रा. अशोक रा. जाधव
फोन (०२४२५) २२१७८८,२२३६२९, मोबा. ९८२२४२५५२२
क्रेडीट कार्ड व डेबिट कार्ड वापरण्याची सुविधा

शेतकऱ्यांचा श्वास ! ग्राहकांचा विश्वास !!
राजहंस
दर्जेदार राजहंस दूध व दूग्धजन्य पदार्थ
संगमनेर तालुका सह. दूध उत्पा. व प्रक्रिया संघ मर्या.
अमृतनगर (घुलेवाडी), ता. संगमनेर, जि. अहमदनगर
(०२४२५) २२५४१०, २२५५१०, २२६१६१, २२६१६२
www.rajhansmilk.com rajhansmilk@gmail.com

धन्वंतरी
मल्टिस्पेशालिटी हॉस्पिटल
We treat He cure's
डॉ. प्रविणकुमार पानसरे मो. ९८२२३९७५७४
डॉ. दिपाली पानसरे मो. ७४९९१७६८६४
उपलब्ध सुविधा: मेडिसीन विभाग, सर्जरी विभाग, अस्थिरोग विभाग, सुपर स्पेशालिटी सुविधा,स्त्रीरोग विभाग, न्युरो सर्जरी, प्लास्टिक सर्जरी, युरो सर्जरी, कॅन्सर सर्जरी
महात्मा ज्योतिबा फुले जन आरोग्य योजनेअंतर्गत डायलेसिस सुविधा उपलब्ध
या योजनेअंतर्गत येणाऱ्या ऑपरेशनचा लाभ घेण्यासाठी आपले ओरिजनल आधार कार्ड व रेशनकार्ड असणे गरजेचे आहे
धन्वंतरी मल्टिस्पेशालिटी हॉस्पिटल, ताजणे मळा, नवीन नगर रोड, संगमनेर, जि. अ.नगर, फोन (०२४२५) २२७५७४, २२७५७५

आपल्या व्यवसायाची जाहीरात येथे प्रसिद्ध करा
संपर्क
८८३०५०८२४४ ८३८०९५६६०४
७६२०३८८२३०



# धोकादायक झाडांमुळे अपघाताचा धोका

## प्रशासनाने तातडीने कारवाई करावी, नागरिकांची मागणी



युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर - संगमनेर शहरातील १३२ के.व्ही. चौक ते अकोले बायपास रोड सर्कल हा कायम वर्दळीचा मार्ग असून या मार्गावरील रस्त्याच्या दुतर्फा असलेल्या अनेक झाडांच्या फांद्या झुकलेल्या, वाकलेल्या तसेच तुटलेल्या अवस्थेत आहेत. या फांद्या कधीही रस्त्यावर कोसळण्याची शक्यता निर्माण झाल्याने वाहनचालक, पादचारी आणि प्रवाशांच्या सुरक्षिततेचा गंभीर प्रश्न निर्माण झाला आहे.

सध्या सुरू असलेल्या पावसाळ्यात मुसळधार पाऊस व वादळी वाऱ्यामुळे या धोकादायक फांद्या कोसळून मोठा अपघात होण्याची भीती नागरिकांकडून व्यक्त केली जात आहे. विशेष म्हणजे, या झाडांमधून वीज वाहक तारा गेल्या असून फांद्यांचा तारांशी वारंवार घर्षण होत असल्याने स्पार्किंगच्या घटनाही घडत आहेत.

स्थानिकांच्या माहितीनुसार, काल या वीजवाहक तारांमधून मोठा स्पार्क होऊन मोठा आवाज झाला. त्यामुळे परिसरात काही काळ भीतीचे वातावरण निर्माण झाले होते. सुदैवाने कोणतीही जीवितहानी झाली नाही; मात्र भविष्यात मोठी दुर्घटना घडण्याची शक्यता नाकारता येत नाही.

संभाव्य अपघात टाळण्यासाठी संगमनेर नगरपालिकेने तसेच संबंधित वीज वितरण विभागाने तातडीने संयुक्त पाहणी करून धोकादायक फांद्यांची छाटणी करावी, तसेच वीजवाहक तारांवरील धोका दूर करावा, अशी जोरदार मागणी नागरिक व प्रवाशांकडून करण्यात येत आहे.

# 'मिसिंग लिंक' वादाच्या भोवऱ्यात

## ७ हजार कोटींचा खर्च, बोगद्यात गळती, रस्त्याला तडे

मुंबई (वृत्तसंस्था)

मुंबई-पुणे एक्स्प्रेस वेवरील 'मिसिंग लिंक' प्रकल्प पहिल्याच मुसळधार पावसात वादाच्या भोवऱ्यात सापडला आहे. प्रकल्पाचे उद्घाटन होऊन अवघे दोन महिने उलटत नाहीत, तोच बोगद्यांमध्ये झालेली पाण्याची गळती, मुख्य रस्त्याला गेलेले तडे आणि दरड दुर्घटना यामुळे या ७ हजार कोटींच्या प्रकल्पाच्या कामाच्या गुणवत्तेवर गंभीर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. यावरूनच आता विरोधकांनी महायुती सरकारला धारेवर धरत, हा तांत्रिक चमत्कार आहे की कंत्राटदारांना पोसणारा कमिशनखोरीचा नवा मार्ग? असे जळजळीत प्रश्न उपस्थित करत सरकारची कोंडी केली आहे. एकीकडे सत्ताधारी याला केवळ दरड कोसळण्याची नैसर्गिक घटना असे सांगत प्रकल्पाचा बचाव करत असले, तरी अवघ्या ६० दिवसांत उघड पडलेल्या या त्रुटींमुळे प्रवाशांच्या सुरक्षेचा मुद्दा ऐरणीवर आला आहे. नेमका काय आहे हा जगातील सर्वात रुंद बोगदा असणारा 'मिसिंग लिंक' प्रकल्प, याचे तांत्रिक आव्हान काय होते आणि या पहिल्याच दुर्घटनेवरून राजकीय वर्तुळात रामायण रंगले.

मिसिंग लिंक प्रकल्पाच्या उद्घाटनावेळी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी, आता इथून पुढे हा शेवटचा ट्रॅफिक असेल,'असे सांगत हा महामार्ग पूर्णपणे सुरक्षित असल्याचा दावा केला होता. त्यांनी त्यावेळी राजकीय भूमिका मांडली होती, मात्र काल पुन्हा या मार्गावर मोठी वाहतूक कोंडी पाहायला मिळाली यानंतर आमदार रोहित पवार यांनी राज्य सरकारवर जोरदार टीका केली. प्रकल्पाचे उद्घाटन होऊन अवघे २ महिने होत असताना बोगद्यात पाण्याची गळती, रस्त्यांवर तडे आणि दरड कोसळल्याच्या घटनांमुळे कामाच्या गुणवत्तेवर गंभीर प्रश्न निर्माण झाल्याचा आरोप त्यांनी केला आहे.

अंबादास दानवे म्हणाले की, मिसिंग लिंक १ मे रोजी खुला झाला होता. अवघ्या ६० ते ६५ दिवसामध्ये त्या रस्त्याचे काय हाल झाले हे आपण पाहतो आहोत. दोन दिवसाच्या पावसाने सरकारचे वाभाडे काढले आहेत. बोगद्यामध्ये ढबढबे सुरू आहेत. मुख्यमंत्र्यांनी शोबाजी करण्याचे काम सुरू केले आहे. सरकार यावर गोल-गोल उत्तरं देतील. सरकार कंत्राटदारांना पोसण्याचे आणि जनतेच्या जीवाशी खेळण्याचे काम करत आहेत.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले की, मिसिंग लिंकमध्ये बोगदा असो की काही इतक्या प्रचंड परिस्थितीमध्येही त्या ठिकाणी कुठलंही डिझास्टर झालेले नाही. जे झाले आहे ते समोरच्या भागात झाले आहे. या सर्व घटना निसर्गाचे चक्र बदलल्यामुळे घडत आहेत. प्रशासनाची पूर्ण तयारी होती, पण जिथे यापूर्वी कधीच दरड कोसळली नाही, तिथे ती कोसळली.

# पुणे-नाशिक महामार्गावर खड्डे

युवावार्ता (प्रतिनिधी)

घारगाव - पुणे-नाशिक राष्ट्रीय महामार्गावरील मुळा नदीच्या पुलाची पावसाळ्याच्या सुरुवातीलाच प्रचंड दुरवस्था झाली असून, पुलावर ठिकठिकाणी मोठे खड्डे पडले आहेत. सध्या सुरू असलेल्या पावसामुळे या खड्ड्यांमध्ये मोठ्या प्रमाणावर पाणी साचत आहे. पाणी साचल्याने वाहनचालकांना खड्ड्यांच्या खोलीचा अंदाज येत नाही. ज्यामुळे याठिकाणी अपघातांची मालिका सुरू होण्याची भीती निर्माण झाली आहे. या गंभीर समस्येकडे हिवरगाव टोलनाका प्रशासनाने पूर्णपणे दुर्लक्ष केले असल्याचा आरोप नागरिक करत आहेत..

सदर महामार्ग अत्यंत वर्दळीचा असून या पुलावरून दिवसाकाठी हजारो लहान-मोठी वाहने धावत असतात. महामार्गावरील वाहनांचा वेग जास्त असतो. पुलावरील खड्डे चुकवण्याच्या नादात अनेकदा वाहनचालकांना अचानक ब्रेक दाबावा लागत आहे, त्यामुळे पाठीमागून येणाऱ्या वाहनांची धडक होऊन अपघात घडत आहेत. विशेषतः दुचाकीस्वारांसाठी हे खड्डे अत्यंत जीवघेणे ठरत आहेत. खड्ड्यांमुळे वाहनांचे टायर फुटून एखादा भीषण अपघात होण्याची दाट शक्यता निर्माण झाली आहे. तसेच, वेग मंदावत असल्याने पुलावर रोज

मोठी वाहतूक कोंडी होत आहे. दरवर्षी पावसाळ्यात या पुलाची अशीच स्थिती होते. या गंभीर परिस्थितीबाबत जागरूक नागरिकांनी हिवरगाव टोलनाक्याच्या टोल फ्री क्रमांकावर अनेकदा तक्रारी केल्या आहेत, मात्र टोल प्रशासनाने या तक्रारींची साधी दखलही घेतलेली नाही. टोल वसूल करणाऱ्या प्रशासनाच्या या ढिसाळ आणि बेजबाबदार कारभारामुळे स्थानिक नागरिक आणि वाहनधारकांमध्ये तीव्र संताप व्यक्त होत आहे. त्यामुळे एखादा मोठा अपघात घडल्यानंतर आणि निष्पाप नागरिकांचा बळी गेल्यानंतरच संबंधीत राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण आणि टोल प्रशासनाला जाग येणार का ? असा संतप्त सवाल आता उपस्थित केला जात आहे.

# मोठी स्वप्ने पाहा, कठोर परिश्रम करा आणि व्यसनांपासून दूर राहा- डीवायएसपी सोनवणे



युवावार्ता (प्रतिनिधी)

अकोले - महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ, मुंबई व महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघ, मुंबई यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित गुणवंत विद्यार्थी गौरव सोहळ्यात संगमनेरचे उपविभागीय पोलीस अधिकारी कुणाल सोनवणे यांनी विद्यार्थ्यांना प्रेरणादायी मार्गदर्शन केले. यशासाठी मोठी स्वप्ने, कठोर परिश्रम, आई-वडील व गुरुजनांचे आशीर्वाद आणि व्यसनमुक्त जीवन ही यशाची चार महत्त्वाची सूत्रे असल्याचे त्यांनी सांगितले.

प्रारंभी त्यांनी गुणवंत विद्यार्थी, पालक, शिक्षक व मुख्याध्यापकांचे अभिनंदन करत विद्यार्थ्यांच्या यशामागे शिक्षकांचेही मोठे योगदान असल्याचे नमूद केले. यश नम्रतेने स्वीकारावे आणि अपयशाला धैर्याने सामोरे जावे, असा सकारात्मक संदेश त्यांनी दिला. स्वतःच्या शालेय जीवनातील अनुभव सांगताना त्यांनी नगरपालिकेच्या छोट्या शाळेत शिक्षण घेतल्याचे सांगितले. शाळा लहान असली तरी शिक्षकांचे समर्पित मार्गदर्शन मोठे असल्यामुळे अनेक विद्यार्थी विविध क्षेत्रांत यशस्वी झाल्याचे त्यांनी नमूद करत शिक्षकांविषयी कायम कृतज्ञता बाळगण्याचे आवाहन केले.

विद्यार्थ्यांनी स्पष्ट ध्येय निश्चित करून त्यासाठी सातत्याने मेहनत करावी, पालक व शिक्षकांच्या मार्गदर्शनाचा आदर करावा आणि मोबाईल, सोशल मीडिया तसेच इतर कोणत्याही व्यसनांपासून दूर राहावे, असे आवाहन त्यांनी केले. शिस्त, संयम, सकारात्मक विचार आणि सातत्यपूर्ण परिश्रम यांच्या बळावर प्रत्येक विद्यार्थी मोठे यश संपादन करू शकतो, असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला.

शेवटी गुणवंत विद्यार्थी, शिक्षक व मुख्याध्यापकांना शुभेच्छा देत, आजचा सन्मान हा तुमच्या पुढील यशस्वी वाटचालीची सुरुवात आहे. मोठी स्वप्ने पाहा, मेहनत करा आणि समाजाचे आदर्श नागरिक बना, असा प्रेरणादायी संदेश त्यांनी दिला.

# भंडारदरा पाणलोटात पर्यटकांना बंदी

राजूर (वार्ताहर) -

भंडारदरा आणि मुळा पाणलोटात धो-धो पाऊस कोसळत आहे. धो-धो पाऊस सुरूच असल्याने पुढच्या काळातही इशारा देण्यात आला आहे. या परिसरात सगळीकडे पाणीच पाणी दिसत आहे. रस्तेही निमुळते झाले आहे. त्यामुळे सुरक्षिततेच्या कारणामुळे सांदनदरी, कोकणकडा, रतनगड, अलंगगड, मदनगड, कुलंगगड, कळसूबाई शिखर, रिव्हर्स फॉलसह इतर वॉटर फॉल तसेच इतर साहसी खेळात पुढील आदेश येईपर्यंत पर्यटकांना बंदी घालण्यात आली आहे. याबाबतचा आदेश महसूल व वनविभागाने काल जारी केला आहे. त्यामुळे सध्या तरी या पाणलोटात फिरण्यासाठी जाण्याचे नियोजन कुणीही करू नये. दरम्यान, जोरदार पावसामुळे शेतीपिकांचे प्रचंड नुकसान झाले आह

भारतीय हवामान विभागाने दिलेल्या अतिवृष्टीच्या इशाऱ्याच्या पार्श्वभूमीवर अकोले तालुक्यातील सर्व अंगणवाड्या, प्राथमिक व माध्यमिक शाळांना मंगळवार, दि. ७ जुलै रोजी सुट्टी जाहीर करण्यात आली आहे. जिल्हाधिकारी तथा जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाचे अध्यक्ष डॉ. पंकज आशिया यांनी याबाबतचे आदेश निर्गमित केले आहेत.

७ जुलै रोजी अकोले तालुक्यात काही ठिकाणी अतिवृष्टी, ढगफुटीसदृश परिस्थिती, पूरस्थिती तसेच नैसर्गिक आपत्तीजन्य परिस्थिती निर्माण झाली आहे. तालुक्यातील काही महसूल मंडळांमध्ये आधीच अतिवृष्टी झालेली आहे. ही स्थानिक परिस्थिती लक्षात घेऊन अकोले तालुक्यातील सर्व अंगणवाड्या, प्राथमिक व माध्यमिक शाळांना दि. ७ जुलै रोजी सुट्टी जाहीर करण्यात आली आहे. मात्र, सुट्टीच्या कालावधीत सर्व मुख्याध्यापक, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी नेहमीच्या कार्यालयीन वेळेत शाळेत उपस्थित राहून स्थानिक प्रशासनाच्या आदेशानुसार आपत्ती व्यवस्थापनासंबंधीचे कामकाज करावे, असेही आदेशात स्पष्ट करण्यात आले होते..

# घरात सोने ठेवणाऱ्यांसाठी मोठी बातमी !

## आयकराचे नियम जाणून घ्या



तुम्हीही घरी सोने ठेवत असाल तर ही माहिती तुमच्यासाठी आहे. तुमची सोन्याची खरेदी आयकर विवरणपत्रात दाखल न केल्यास तुम्हाला मोठा दंड तर भरावा लागेलच, शिवाय तुरुंगवासाची शिक्षाही होऊ शकते. भारतातील आयकर कायद्यानुसार आयटीआरमध्ये तुम्ही घोषित केलेल्या उत्पन्नातून तुम्ही कितीही सोनं खरेदी किंवा घरात ठेवू शकता. पण आयकर विभागाची धाड किंवा तपासणीदरम्यान सीबीडीटीने काही प्रशासकीय मार्गदर्शक तत्त्वे निश्चित केली आहेत जी तुम्हाला एखाद्या विशिष्ट मर्यादेपेक्षा जास्त सोन्याचे दागिने जप्त होण्यापासून संरक्षण देतात.

**घरात सोनं ठेवायचे नियम काय आहेत?** - आयकर कायद्यानुसार घरात किती सोने ठेवायचे यावर कोणतीही मर्यादा निश्चित नाही. पण तुम्ही उत्पन्नाचा कायदेशीर स्रोत किंवा वारसा हक्काने सोने मिळाले असेल तर तुम्ही तुमच्या इच्छेनुसार कितीही सोने बाळगू शकता. अशाप्रकारे, सीबीडीटी च्या मर्यादेनुसार, ४ जणांचे कुटुंब कोणत्याही बिलाशिवाय ९५० ग्रॅमपर्यंत सोने बाळगू शकते. त्याचप्रमाणे, आयकर विभागाच्या मार्गदर्शक तत्त्वांनुसार कुटुंबातील सदस्यांसाठी सवलतीची मर्यादा खालीलप्रमाणे विभागली आहे:

**लग्न झालेली महिला:** कमाल ५०० ग्रॅम

**अविवाहित महिला:** कमाल २५० ग्रॅम

**पुरुष:** कमाल १०० ग्रॅम

अशाप्रकारे तुमच्या कुटुंबात चार सदस्य - पती, पत्नी, एक अविवाहित मुलगा आणि १ अविवाहित मुलगी - असतील तर, तुमच्या घरात पुराव्याशिवाय ९५० ग्रॅम सोने (५०० ग्रॅम + १०० ग्रॅम + १००० ग्रॅम + २५० ग्रॅम) असणे स्वाभाविक आणि वैध मानले जाईल. म्हणजे इतक्या सोन्याच्या होल्डिंगवर आयकर विभाग कारवाई करू शकणार नाही.

**घरात मर्यादेपेक्षा जास्त सोने असेल तर काय?-** दुसरीकडे, लक्षात घ्या की तुमच्या घरात मर्यादेपेक्षा जास्त सोनं असलं तरीही बेकायदेशीर नाही पण तुम्हाला खरेदीचा स्त्रोत उघड करणे आवश्यक असेल ज्यासाठी तुम्ही खालील कागदपत्रे सादर करू शकता.

**खरेदीच्या पावत्या:** ज्वेलरकडून मिळालेली पेमेंटची बिले आणि बँकेच्या व्यवहाराच्या नोंदी.

**वारसा:** मृत्युपत्र, वारसा हक्क प्रमाणपत्र किंवा कौटुंबिक तडजोडीची कागदपत्रे.

**भेटवस्तू:** भेटपत्रे किंवा लग्नातील किंवा इतर भेटवस्तूंचे फोटो.

**इतर:** बिले नसल्यास मूल्यांकन अहवाल किंवा तुमच्या आर्थिक क्षमतेचे प्रतिज्ञापत्र देखील सादर करण्याचा पर्याय आहे.

# आयसीएआर-सीरकोटतर्फे संगमनेर तालुक्यात 'खेत बचाओ अभियान' अंतर्गत जनजागृती

युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर- भारतीय कृषी संशोधन परिषद यांच्या देशव्यापी 'खेत बचाओ अभियान' (Khet Bachao Abhiyan - KBA) उपक्रमांतर्गत आयसीएआर-केंद्रीय कापूस तंत्रज्ञान संशोधन संस्था (ICAR-CIRCOT), मुंबई यांच्या वतीने अहिल्यानगर जिल्ह्यातील संगमनेर तालुक्यात विविध गावांमध्ये दोन दिवसीय शेतकरी जनजागृती कार्यक्रम यशस्वीपणे आयोजित करण्यात आला.



या कार्यक्रमाचा उद्देश शाश्वत शेती पद्धतींबाबत शेतकऱ्यांमध्ये जनजागृती करणे तसेच पीक उत्पादन आणि जमिनीचे आरोग्य सुधारण्यासाठी मृदा व अन्नद्रव्यांचे कार्यक्षम व्यवस्थापन करण्याबाबत मार्गदर्शन करणे हा होता. जनजागृती अभियानादरम्यान शेतकऱ्यांना 'खेत बचाओ अभियान' या उपक्रमाची उद्दिष्टे व महत्त्व यांची सविस्तर माहिती देण्यात आली. तांत्रिक सत्रांमध्ये मृदा परीक्षणावर आधारित अन्नद्रव्य व्यवस्थापन, संतुलित खतांचा वापर तसेच सूक्ष्मजीवाधारित जैवखते, जीवामृत, बीजामृत आणि हिरवळीच्या खतांचा पर्यावरणपूरक वापर याबाबत मार्गदर्शन करण्यात आले. याशिवाय, जमिनीतील उपयुक्त सूक्ष्मजीव अन्नद्रव्यांचे पुनर्चक्रण, सेंद्रिय पदार्थांचे विघटन, मृदेची सुपीकता वाढविणे आणि दीर्घकालीन मृदा आरोग्य सुधारण्यात कशी महत्त्वाची भूमिका बजावतात, याविषयी शेतकऱ्यांना माहिती देण्यात आली. तसेच सूक्ष्मजीवांच्या साहाय्याने ऊसाच्या पाचटाचे जलद विघटन आणि रायझोबियमद्वारे बियाणे प्रक्रिया यांची प्रात्यक्षिकेही दाखविण्यात आली.

हा जनजागृती कार्यक्रम संगमनेर तालुक्यातील चास, वावी, पिंपळे, पिंपरी, कसारे, सायखिंडी, सोनोशी, नान्नज-धुमाळा आणि खांडगाव या गावांमध्ये आयोजित करण्यात आला. या कार्यक्रमात १७० हून अधिक शेतकऱ्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवून शाश्वत शेती आणि जैविक निविष्ठांबाबत विविध विषयांवर शास्त्रज्ञांशी संवाद साधला. आयसीएआर-सीरकोटच्या तज्ज्ञ पथकातील वरिष्ठ शास्त्रज्ञ डॉ. अजिनाथ डूकरे, तसेच तांत्रिक अधिकारी श्री. राजेश नरकर, श्री. मनोज आंबरे आणि श्री. निशांत कांबळी यांनी या कार्यक्रमाचे मार्गदर्शन केले. संगमनेर येथील रेलीगेअर ग्रो लाईफ बायो-सायन्स प्रा. लि. संगमनेर यांच्या सहकार्याने या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. संबंधित संस्थेने शेतकरी व संशोधन संस्थेमधील समन्वय साधण्याची महत्त्वाची भूमिका बजावली.

## संपादकीय...

# स्मार्ट मीटर माध्यमातून ग्राहकांची 'स्मार्ट लूट'?

महाराष्ट्रात स्मार्ट मीटरच्या मुद्द्यावरून निर्माण झालेला वाद आता केवळ तांत्रिक राहिलेला नाही; तो जनतेच्या विश्वासाचा आणि सरकारच्या धोरणात्मक पारदर्शकतेचा प्रश्न बनला आहे. विधानसभेत या विषयावर झालेली खडाजंगी ही विरोधकांची राजकीय भूमिका नसून, राज्यभरातील लाखो वीज ग्राहकांच्या मनात साचलेल्या असंतोषाची तीव्र अभिव्यक्ती आहे. सरकारकडून स्मार्ट मीटर सक्तीचे असून प्रीपेड सुविधा ऐच्छिक असल्याचे सांगितले जात असले, तरी प्रत्यक्षात घडणाऱ्या घटनांमुळे या दाव्यांवरच प्रश्नचिन्ह उभे राहिले आहे. तंत्रज्ञानाचा स्वीकार हा काळाची गरज आहे. वीज वितरण अधिक कार्यक्षम, पारदर्शक आणि अचूक करण्यासाठी स्मार्ट मीटर निश्चितच उपयुक्त ठरू शकतात. मात्र, कोणतीही योजना लोकांच्या विश्वासावर उभी राहते; सक्तीवर नव्हे. दुर्दैवाने, अनेक ठिकाणी खाजगी कंत्राटदारांची माणसे ग्राहकांची पूर्वसंमती न घेता थेट घरांमध्ये जाऊन जुने मीटर काढून नवीन स्मार्ट मीटर बसवत असल्याच्या तक्रारी समोर येत आहेत. त्यानंतर अनेक ग्राहकांच्या वीज बिलात दोन, तीन, अगदी चारपट वाढ झाल्याच्या घटना लोकांमध्ये भीती आणि संताप निर्माण करत आहेत.

विधानसभेत विरोधी पक्षनेते नाना पटोले यांनी उपस्थित केलेले प्रश्न सरकारला अस्वस्थ करणारे ठरले. ग्राहकांच्या हितासाठी असल्याचा दावा करणारी योजना जर ग्राहकांवरच लादली जात असेल, तर तिच्या उद्दिष्टांवरच संशय निर्माण होणे स्वाभाविक आहे. महाराष्ट्रातील लाखो प्रामाणिक वीज ग्राहकांना सरकार त्यांच्यावर विश्वास ठेवत नाही, अशी भावना निर्माण होत आहे. त्यातच मुख्यमंत्री आणि ऊर्जा मंत्र्यांच्या विधानांमध्ये दिसणारा विसंवाद जनतेचा गोंधळ आणखी वाढवत आहे. सभागृहात दिलेली आश्वासने प्रत्यक्षात कितपत पाळली जात आहेत, हा प्रश्न आज सर्वसामान्यांच्या मनात आहे. विशेष म्हणजे, सत्ताधारी पक्षाचे आमदार नितेश राणे यांनीही या विषयावर व्यक्त केलेली चिंता दुर्लक्षित करता येणार नाही. ग्रामीण भागात स्मार्ट मीटरविरोधात लोक रस्त्यावर उतरत आहेत, हे त्यांनी स्पष्टपणे मांडले. मंत्रालयातील अधिकाऱ्यांनी केवळ चार टक्के तक्रारी असल्याचा दावा केला असला, तरी प्रत्यक्षात तक्रारींचे प्रमाण अनेकपटीने अधिक असल्याचे चित्र दिसत आहे. जर लोकप्रतिनिधींनाच प्रशासनाच्या आकडेवारीवर विश्वास वाटत नसेल, तर या संपूर्ण योजनेच्या विश्वासार्हतेवर गंभीर प्रश्नचिन्ह उभे राहते.

सोलापूरसह राज्यातील विविध भागांतून वाढीव वीज बिलांच्या तक्रारी सातत्याने पुढे येत आहेत. त्यामुळे ही समस्या केवळ एखाद्या जिल्ह्यापुरती मर्यादित नसून संपूर्ण महाराष्ट्रातील ग्राहकांची व्यथा बनली आहे. म्हणूनच जनमानसात आता एक प्रश्न ठळकपणे विचारला जात आहे-ही योजना खरंच 'स्मार्ट मीटर' आहे की 'स्मार्ट लूट'? लोकशाही व्यवस्थेत जनतेचा आवाज हा अंतिम असतो. जेव्हा तंत्रज्ञानाच्या नावाखाली नागरिकांवर आर्थिक भार पडत असल्याची भावना निर्माण होते, तेव्हा असंतोष उसळणे अपरिहार्य ठरते. सरकारने वारंवार स्मार्ट मीटरमुळे बिल वाढत नाही असा दावा केला आहे. मग हजारो ग्राहक वाढीव बिलांच्या तक्रारी का करत आहेत? या प्रश्नाचे स्पष्ट, वस्तुनिष्ठ आणि विश्वासार्ह उत्तर सरकारने देणे आवश्यक आहे. यासाठी आता स्वतंत्र आणि निष्पक्ष चौकशी अपरिहार्य झाली आहे. स्मार्ट मीटर बसविणाऱ्या कंत्राटदारांच्या कार्यपद्धतीची तपासणी झाली पाहिजे. जुन्या आणि नव्या मीटरच्या अचूकतेचे परीक्षण एखाद्या स्वतंत्र तज्ज्ञ संस्थेकडून करून त्याचा अहवाल सार्वजनिक केला पाहिजे. ग्राहकांच्या तक्रारींचे तातडीने निवारण करून त्यांचा विश्वास पुन्हा मिळवणे ही सरकारची प्राथमिक जबाबदारी आहे. सक्तीच्या बळावर कोणतीही योजना यशस्वी होत नाही. लोकांचा सहभाग, पारदर्शकता आणि विश्वास या तीन स्तंभांवरच कोणतेही धोरण टिकून राहते. अन्यथा, चांगल्या उद्देशाने सुरू झालेली योजनाही जनतेच्या रोषाचे कारण ठरते. मुख्यमंत्री आणि ऊर्जा मंत्र्यांनी या प्रकरणात स्वतः लक्ष घालून वस्तुस्थिती समोर आणावी, दोषींवर कठोर कारवाई करावी आणि ग्राहकांच्या हिताचे संरक्षण करणारे ठोस धोरण जाहीर करावे. कारण जनतेचा विश्वास गमावून साधलेला विकास हा केवळ कागदावरील आकडा ठरतो.

आजची गरज स्मार्ट मीटरची नाही, तर स्मार्ट प्रशासनाची आहे. सरकारने जनतेच्या भावना समजून घेतल्या, तक्रारींचे प्रामाणिकपणे निराकरण केले आणि आवश्यक तेथे धोरणाचा पुनर्विचार केला, तरच ही योजना लोकाभिमुख ठरेल. अन्यथा, स्मार्ट मीटर हे नाव इतिहासात स्मार्ट लूट म्हणूनच नोंदले जाण्याची भीती नाकारता येणार नाही.

# अकोले मेडिकल फाउंडेशनच्या वतीने वृक्षारोपण



युवावार्ता (प्रतिनिधी)-

अकोले- परखतपूर (झापवाडी), ता. अकोले येथे अकोले मेडिकल फाउंडेशनचे अध्यक्ष डॉ. प्रकाश वाकचौरे यांच्या संकल्पनेतून वृक्षारोपणाचा उपक्रम उत्साहात पार पडला.

पर्यावरणाचा समतोल राखण्यासाठी आणि भावी पिढ्यांना स्वच्छ, निरोगी वातावरण मिळावे या उद्देशाने दरवर्षी पावसाळ्याच्या प्रारंभी अकोले मेडिकल फाउंडेशनच्या वतीने वृक्षारोपण केले जाते. यंदा हवामानातील बदल, वाढते तापमान आणि मोठ्या प्रमाणावर होणारी वृक्षतोड यामुळे पावसाचे आगमन सुमारे महिनाभर उशिरा झाले. ही परिस्थिती पर्यावरण संवर्धनाची गरज अधिक अधोरेखित करणारी आहे.

वृक्ष हे पृथ्वीचे फुफ्फुसे मानले जातात. ते प्राणवायू निर्माण करून कार्बन डायऑक्साइडचे प्रमाण कमी करतात, भूजल पातळी टिकवून ठेवण्यास मदत करतात, मृदा धूप रोखतात तसेच जैवविविधतेचे संरक्षण करतात. त्यामुळे प्रत्येक नागरिकाने दरवर्षी किमान एक तरी वृक्ष लावून त्याचे संगोपन करणे ही काळाची गरज आहे. वृक्ष लावणे जितके महत्त्वाचे, तितकेच ते जगवणे अधिक महत्त्वाचे आहे, असा संदेश या उपक्रमातून देण्यात आला.

यावेळी श्री. दिनकर वाकचौरे, अंबादास गजे, सोन्याबापू वाकचौरे, दौलत वाकचौरे, बाबाजी वाकचौरे, गणेश वाकचौरे, अक्षय वाकचौरे, सोहम वाकचौरे, सचिन वाकचौरे, कार्तिक वाकचौरे, ओवी वाकचौरे, मोनाली वाकचौरे, अलका वाकचौरे, मंगल वाकचौरे तसेच अकोले मेडिकल फाउंडेशनच्या सचिव सौ. रूपाली वाकचौरे यांच्या उपस्थितीत आंबा, नारळ, अंजीर, चिंच, पेरू, बोर तसेच विविध फुलझाडांची लागवड करण्यात आली.

उपस्थितांना वृक्षारोपणानंतर झाडांची नियमित निगा राखणे, पाणी देणे, संरक्षणासाठी कुंपण करणे आणि झाडे जगविण्याचे महत्त्व याबाबत मार्गदर्शन करण्यात आले. पर्यावरण संवर्धनासाठी समाजातील प्रत्येक घटकाने पुढाकार घेऊन अधिकाधिक वृक्ष लागवड व संगोपन करावे, असे आवाहन यावेळी करण्यात आले.

# बाल पुरस्कारासाठी ऑनलाइन नोंदणी

युवावार्ता (प्रतिनिधी)

अहिल्यानगर - विविध क्षेत्रांत उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या बालकांचा गौरव करण्यासाठी केंद्र शासनाच्या वतीने दिल्या जाणाऱ्या प्रधानमंत्री राष्ट्रीय बाल पुरस्कार-२०२६ साठी ऑनलाइन अर्ज प्रक्रिया सुरू झाली आहे. पात्र बालकांनी तसेच त्यांच्या वतीने संबंधित संस्था, पालक व अन्य पात्र यंत्रणांनी ३१ जुलै २०२६ पर्यंत अर्ज सादर करावेत, असे आवाहन जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी संजय कदम यांनी केले आहे.

या पुरस्कारासाठी अर्जदार बालकाचे वय पाच वर्षांपेक्षा अधिक व ३१ जुलै २०२६ रोजी १८ वर्षांपेक्षा कमी असणे आवश्यक आहे. अर्ज केवळ https://awards.gov.in या अधिकृत संकेतस्थळावर ऑनलाइन पद्धतीनेच स्वीकारले जातील. स्वतः बालक, पालक, राज्य सरकार, केंद्रशासित प्रदेश प्रशासन, जिल्हाधिकारी, पंचायती राज संस्था, नागरी स्वराज्य संस्था तसेच शैक्षणिक संस्था संबंधित मुलाचे अथवा मुलीचे नामनिर्देशन पुरस्कारासाठी करू शकतात. पात्र बालकांनी वेळेत अर्ज सादर करून या संधीचा लाभ घ्यावा, असेही श्री. कदम यांनी कळविले आहे.

# आपत्कालीन परिस्थितीत हेल्पलाईन क्रमांकावर संपर्क करण्याचे आवाहन

युवावार्ता (प्रतिनिधी)

अहिल्यानगर- राज्यात उद्भवलेल्या संभाव्य पूरपरिस्थिती आणि मुसळधार पावसाच्या पार्श्वभूमीवर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी राज्यातील जनतेला पूर्णपणे सतर्क राहण्याचे आणि प्रशासनाला सहकार्य करण्याचे आवाहन केले आहे.

राज्यात कोणत्याही प्रकारची आपत्कालीन परिस्थिती निर्माण झाल्यास नागरिकांना तातडीने मदत मिळावी, यासाठी राज्य सरकारची संपूर्ण यंत्रणा सज्ज असून २४ तास कार्यरत असणारे नियंत्रण कक्ष सुरू करण्यात आले आहेत. नागरिकांनी कोणत्याही अफवांवर विश्वास न ठेवता केवळ अधिकृत सूत्रांकडून येणाऱ्या माहितीचा आधार घ्यावा आणि संकटसमयी जाहीर केलेल्या अधिकृत हेल्पलाईन क्रमांकांवर त्वरित संपर्क साधावा, असे मुख्यमंत्र्यांनी स्पष्ट केले आहे. राज्यस्तरीय मुख्य नियंत्रण कक्षाशी संपर्क साधण्यासाठी १०७० हा टोल-फ्री क्रमांक कार्यान्वित करण्यात आला असून, नागरिक ०९३२१५८७१४३ या भ्रमणध्वनी क्रमांकावर किंवा ०२२-२२०२७९९० आणि ०२२-२२७९४२२९ या दूरध्वनी क्रमांकांवर देखील थेट संपर्क साधू शकतात. याशिवाय, प्रत्येक जिल्ह्यामध्ये स्थानिक पातळीवर जलद गतीने मदत कार्य राबवण्यासाठी आणि परिस्थितीवर तात्काळ नियंत्रण मिळवण्यासाठी जिल्हास्तरीय नियंत्रण कक्षही सज्ज ठेवण्यात आले आहेत, ज्यांचा मुख्य संपर्क क्रमांक १०७७ असा आहे, असेही आवाहन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केले आहे.

दरड कोसळण्याची शक्यता असलेल्या संवेदनशील क्षेत्रांतील नागरिकांच्या सुरक्षिततेची योग्य ती काळजी घेण्याच्या सूचना प्रशासनाला देण्यात आल्या आहेत. कोणत्याही आपत्कालीन प्रसंगी नागरिकांनी अजिबात न घाबरता या जाहीर केलेल्या हेल्पलाईन क्रमांकांवर संपर्क साधून प्रशासकीय यंत्रणेची मदत घ्यावी, असे आवाहन मुख्यमंत्र्यांनी केले आहे.

# शालेय फुटबॉल स्पर्धेसाठी अर्ज सुरू

युवावार्ता (प्रतिनिधी)

अहिल्यानगर - क्रीडा व युवक सेवा संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे यांच्या अंतर्गत जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय व महानगरपालिका, अहिल्यानगर यांच्या संयुक्त विद्यमाने सन २०२६-२७ या वर्षासाठी सुब्रतो मुखर्जी आंतरराष्ट्रीय फुटबॉल स्पर्धा (सब-ज्युनियर व ज्युनियर) ग्रामीण जिल्हास्तरीय तसेच महानगरपालिका स्तरावर आयोजित करण्यात येत असून, पात्र शाळा, महाविद्यालयांनी आपल्या संघांची दि. १० जुलै २०२६ पर्यंत ऑनलाइन नोंदणी करून अर्ज सादर करावेत, असे आवाहन जिल्हा क्रीडा अधिकारी ज्ञानेश्वर खुरंगे यांनी केले .

स्पर्धेत सहभागी होण्यासाठी शाळांनी www.subrotocup.in/register या संकेतस्थळावर संघनोंदणी करणे आवश्यक असून, १५ वर्षांखालील खेळाडूंनी अखिल भारतीय फुटबॉल महासंघ (एआयएफएफ) मान्यताप्राप्त Selection Maturity Age Determination Test (SMADT) पूर्ण केलेली असावी. शाळांनी संघनोंदणी अर्ज व आवश्यक कागदपत्रे रहळश्रूरपरसरीवेसारळश्र.लो या ई-मेलवर पाठवावीत. अर्जाची छायाप्रत संबंधित शाळेत जतन करून ठेवावी. स्पर्धेसाठी १५ वर्षांखालील (सब-ज्युनियर) मुलांचा जन्म १ जानेवारी २०१२ रोजी किंवा त्यानंतर झालेला असावा, तर १७ वर्षांखालील (ज्युनियर) मुला-मुलींचा जन्म १ जानेवारी २०१० रोजी किंवा त्यानंतर झालेला असावा. स्पर्धेबाबत अधिक माहितीसाठी सचिन राजपूत, क्रीडा मार्गदर्शक, जिल्हा क्रीडा कार्यालय, अहिल्यानगर मो. ८०८७०७६६३३ / ८३६९५३९०७७ अथवा विल्सन फिलिप्स, मनपा क्रीडा अधिकारी मो. ९४२०७९६१४० यांच्याशी संपर्क साधावा.

# महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाचे चार वरिष्ठ अधिकारी निलंबित

युवावार्ता (प्रतिनिधी)

अहिल्यानगर - जलजीवन मिशन कार्यक्रमांतर्गत अहिल्यानगर जिल्ह्यात राबविण्यात येत असलेल्या ग्रामीण नळ पाणीपुरवठा योजनांच्या कामात अत्यंत गंभीर स्वरूपाच्या त्रुटी, निकृष्ट दर्जा आणि अनियमितता आढळून आल्या आहेत. या प्रकरणी शासनाने मोठी कारवाई करत महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांना निलंबित केले आहे. या निलंबित अधिकाऱ्यांमध्ये जी. एस. भोगावडे (कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, अहिल्यानगर), एस.एस. दहिफळे (उप अभियंता, म.जी. प्रा. उपविभाग नेवासा), एस.आर. वारे (तत्कालीन कार्यकारी अभियंता, म. जी. प्रा. संगमनेर) आणि एम. पी. धगधगे (तत्कालीन उप अभियंता) यांचा समावेश आहे.

जिल्ह्यातील ११२ गावांमधील जलजीवन मिशनच्या कामांमध्ये मोठ्या प्रमाणात गैरव्यवहार व निष्काळजीपणा होत असल्याची लेखी तक्रार शासनाकडे प्राप्त झाली होती. या तक्रारीची दखल घेत जलजीवन मिशनच्या संचालकांनी ४ ऑगस्ट २०२५ रोजी एक विशेष चौकशी समिती गठित केली. समितीने ८ ऑक्टोबर २०२५ रोजी आपला सविस्तर चौकशी अहवाल सादर केला, ज्यामध्ये कामाचा दर्जा अत्यंत निकृष्ट असल्याचे स्पष्ट झाले. हा अहवाल पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री गुलाबराव पाटील यांनी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना सादर केला असता, त्यांनी संबंधितांवर निलंबन करून विभागीय चौकशी करावी असे

निर्देश दिले होते. त्यानुसार, पाणीपुरवठा व स्वच्छता विभागाच्या निर्देशान्वये ही कारवाई करण्यात आली आहे.


**ड्रायव्हर पाहिजे**
ऑटोमॅटिक गाडीसाठी 01 जागा
मॅन्युअरल गेअर गाडीसाठी 01 जागा
निर्व्यसनी ड्रायव्हर पाहिजे
– संपर्क –
9117175050

**CHANGE IN NAME**
I SHAHANAVAJ RIYAJ SHAIKH KURAN ROAD, SANGAMNER, TAL - SANGAMNER, DIST- AHMEDNAGAR HAVE CHANGED THE NAME OF MY MINOR SON OLD NAME OWESH SHAHNAWAJ SHAIKH

**CHANGE IN NAME**
I HAVE CHANGED MY OLD NAME AQEEB RIYAZ ATTAR
NEW NAME AS AKIB RIYAJ ATTAR
ADD - KUMBHAR GALLI, SANGAMNER TAL- SANGAMNER, DIST AHMEDNAGAR

**पाहिजेत**
प्रो-माईन्ड एआय आयटी ट्रेनिंग इन्स्टिट्यूटसाठी त्वरित दोन जागा भरणे आहे.
(B.E Comp/IT, BCA/BCS)
— संपर्क —
8282825818

**पाहिजेत**
ड्रायव्हर - २ (एल.एम.व्ही.)
क्लर्क - २ (पदवीधर)
अकाउंटट - २ (टॅली)
कॉम्प्युटर ऑपरेटर -२ पदवीधर
डॉ. इथापे हॉस्पिटल, संगमनेर
9822791484
9518556933
9370017177

**पाहिजेत**
मे. मोहनलाल बन्सीलाल दरडा
कॉम्प्युटर ऑपरेटर (१ जागा)
– पत्ता–
श्रद्धा फर्निचर शेजारी, अकोले रोड, संगमनेर
9822426782

**पाहिजेत**
श्री गणेश डिस्ट्रीब्यूटर्स्
श्री गणेश टायर्स
श्री गणेश ऑइल सेंटर
या फर्मसाठी
अकाऊंटंट - 2 जागा
पुरूष - टॅली आणि एक्सेलचे ज्ञान अवश्यक
कामाचा अनुभव आवश्यक
८९९९८६२७५९

**पाहिजेत**
श्रद्धा एजन्सी
ड्रायव्हर - २ जागा
जे. पी. रोड, रंगारगल्ली संगमनेर, जि. अ.नगर
— संपर्क —
9665557877

**पाहिजेत**
स्पेशल सिक्युरिटी फोर्स व बाऊन्सर सर्विसेस
सिक्युरिटी गार्ड - ५
महिला - ३
सफाई कर्मचारी - ५
हेल्पर - ५
संपर्क - तिरंगा चौक, मालदाड रोड, संगमनेर
7709828846

**भाड्याने देणे**
संगमनेर बस परिसरात, नासिक- पुणे हायवे लगत (तारा पान) च्या वर ऑफिस भाड्याने देणे आहे.
संपर्क
9922008706

**पाहिजेत**
वेल्डिंग कामासाठी कामगार पाहिजेल
वेल्डर - 2 जागा
हेल्पर - २ जागा
7030125701
7972963397








**तहसिलदार,तथा कार्यकारी दंडाधिकारी संगमनेर, यांचे कार्यालय ता. संगमनेर,जिल्हा अहिल्यानगर**

ई-मेल : tahsildarsangamner@gmail.com दूरध्वनी (०२४२५) २२५३५३

क्र. कावी/ सेतु/ जन्म नोंद/५५४/२०२६ दिनांक - २४/०६/२०२६

**जाहिरनामा**

याद्वारे सर्व लोकांना जाहिररित्या कळविण्यात येते की, अर्जदार श्री. मदन रामराव देशमुख, रा. पिंपरणे, ता. संगमनेर, जि. अहिल्यानगर यांनी दिनांक ०७/०४/२०२६ रोजी दाखल केलेल्या अर्जावरुन सुरु करण्यात आले. अर्जदार हे रा. पिंपरणे, ता. संगमनेर, जि. अहिल्यानगर येथील रहिवासी असून अर्जदार यांचा/यांची बहिण नामे मालण रामराव देशमुख यांचा जन्म मौजे पिंपरणे, ता. संगमनेर, जि. अहिल्यानगर येथे दिनांक ०१/०७/१९६२ रोजी झाला असून त्यांचा/त्यांची जन्म नोंद निबंधक तथा ग्रामविकास अधिकारी, पिंपरणे यांचे कार्यालयामध्ये उपलब्ध नसल्यामुळे त्याबाबतची नोंद घेण्याबाबतचे प्रकरण या कार्यालयात दाखल केले आहे. तरी ज्या व्यक्तींना तक्रारी/हरकती दाखल करावयाच्या असल्यास निबंधक तथा ग्रामविकास अधिकारी, पिंपरणे यांचे कार्यालयीन नोटीस बोर्डावर जाहीरनामा प्रसिध्दी झाल्या पासुन ३० दिवसाचे आत सुटीचे दिवस वगळून लेखी स्वरुपात तक्रार या कार्यालयात दाखल करावी. मुदतीनंतर त्या तक्रारीचा विचार केला जाणार नाही, कृपया याची नोंद घ्यावी.

तहसिलदार संगमनेर

# ग्रामीण आरोग्यसेवेला नवी दिशा

## शिवम मल्टीस्पेशालिटी हॉस्पिटलचे उत्साहात लोकार्पण



युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर - संगमनेर शहरालगत घुलेवाडी येथील आरोटे हॉस्पिटल आता अत्याधुनिक सुविधांनी सुसज्ज अशा शिवम मल्टीस्पेशालिटी हॉस्पिटल च्या नव्या स्वरूपात सुरू झाले असून रविवारी (दि. ५) आयोजित भव्य लोकार्पण सोहळा उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला. या सोहळ्यास माजी मंत्री बाळासाहेब थोरात, आमदार अमोल खताळ यांच्यासह विविध क्षेत्रांतील मान्यवर, सामाजिक कार्यकर्ते, संगमनेर शहर व तालुक्यातील नामवंत डॉक्टर, तसेच नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

यावेळी उपस्थित मान्यवरांनी नव्याने उभारण्यात आलेल्या अत्याधुनिक आरोग्य सुविधांची पाहणी केली. रुग्णालयातील सुसज्ज ऑपरेशन थिएटर, आधुनिक वैद्यकीय उपकरणे, अत्याधुनिक तपासणी विभाग, रुग्णकेंद्री सेवा आणि विविध उपचार सुविधांची माहिती घेत उपस्थितांनी समाधान व्यक्त केले.

माजी मंत्री बाळासाहेब थोरात यांनी ग्रामीण भागात आधुनिक आरोग्य सुविधा उपलब्ध करून देण्याच्या दृष्टीने उभारण्यात आलेले हे रुग्णालय संगमनेरच्या आरोग्य क्षेत्रासाठी मोठी उपलब्धी असल्याचे सांगितले. तर आमदार अमोल खताळ यांनी ग्रामीण रुग्णांना आता महानगरांप्रमाणे दर्जेदार उपचार स्थानिक पातळीवर उपलब्ध होणार असल्याने हे रुग्णालय निश्चितच वरदान ठरेल, असा विश्वास व्यक्त केला.

यावेळी संगमनेर शहर व तालुक्यातील नामवंत डॉक्टरांनी शिवम मल्टीस्पेशालिटी हॉस्पिटलला सदिच्छा भेट देत नव्याने उभारण्यात आलेल्या अत्याधुनिक सुविधा, उपचार विभाग आणि वैद्यकीय यंत्रणेची पाहणी केली. या उपक्रमाचे कौतुक करत ग्रामीण भागातील रुग्णांना आधुनिक, सुलभ आणि गुणवत्तापूर्ण आरोग्य सेवा उपलब्ध करून देण्यासाठी हे रुग्णालय महत्त्वपूर्ण भूमिका बजावेल, असे मत व्यक्त केले.

घुलेवाडी येथील यापूर्वीचे आरोटे हॉस्पिटल आता शिवम मल्टीस्पेशालिटी हॉस्पिटल म्हणून नव्या स्वरूपात सुरू झाल्यामुळे संगमनेर तालुक्यासह परिसरातील रुग्णांना अत्याधुनिक वैद्यकीय सेवा स्थानिक पातळीवर उपलब्ध होणार आहे. त्यामुळे उपचारासाठी इतर शहरांकडे जाण्याची गरज मोठ्या प्रमाणात कमी होऊन रुग्णांचा वेळ, पैसा आणि श्रम यांची बचत होणार आहे.

यावेळी मान्यवरांनी डॉ. स्वप्नाली आरोटे, डॉ. अतुल आरोटे, डॉ. स्नेहल आरोटे तसेच संपूर्ण आरोटे परिवाराचे अभिनंदन केले.

# वाकी तलाव ओव्हरफ्लो

छाया – विलास तुपे, राजूर



युवावार्ता (प्रतिनिधी):

राजूर - भंडारदरा पावसाचा जोर वाढल्याने आज कृष्णावती नदीवरील ११२ दलघफू क्षमतेचे निळवंडे धरणाच्या पाणलोट क्षेत्रा तील वाकी जलाशय पूर्ण क्षमतेने भरले. या जलाशयातून ओव्हर फ्लोचे पाणी प्रवरा नदीपात्रातून ओसंडून वाहू लागले. यामुळे यापुढील काळात निळवंडे धरण जलदगतीने भरण्यास मदत होईल. मंगळवारी सकाळी भंडारदऱ्याचा पाणीसाठा ५०४६ दलघफूटवर पोहचला. तर निळवंडे धरणाचा १८३९ द.ल.घ.फू पाणी साठा झाला.

अकोले तालुक्यातील प्रवरा व मुळा नदी खोऱ्यांच्या उगमापासून ओढे नाले आता भरून वाहत आहेत. सह्याद्रीच्या डोंगररांगा धबधब्यांनी सजल्या. सर्वप्रथम मुळा नदीवरील १९३ दलघफू क्षमतेचा अंबित लघुपाटबंधारे प्रकल्प तुडुंब भरला. निळवंडे धरणाच्या पाणलोट क्षेत्रातील प्रवरा नदीची उपनदी असलेल्या कृष्णावती नदीवरील ११२ दलघफू क्षमतेचा वाकी तलाव पूर्ण क्षमतेने भरल्यामुळे ओव्हरफ्लो झाला. याचा अनुकूल परिणाम निळवंडे धरणातील पाणीसाठा वाढण्यास होणार आहे. सोमवार पावसाची जोरदार बॅटींग झाली. असाच पाऊस जर टिकून राहिला तर भात अवणी लवकर सुरवात होऊ शकते .

भंडारदरा धरणाचा आजचा पाणीसाठा ५०४६ दशलक्ष घनफुटावर पोहचला आहे. तर रतनवाडी ११३ मि. मी. पांजरे ८६ मि.मी. भंडारदरा ७२ मि.मी घाटघर १४०मि.मीटर, वाकी ६६ मि.मी मिलिमीटर पावसाची नोंद झाली असल्याची नोंद पाटबंधारे विभागात झाली आहे.

# मुसळधार पावसाच्या इशाऱ्यामुळे नदीकाठच्या गावांना सतर्कतेचा इशारा



युवावार्ता (प्रतिनिधी)


अहिल्यानगर - भारतीय हवामान विभागाने जिल्ह्यासाठी मुसळधार पाऊस व ढगफुटीची शक्यता वर्तवत रेड अलर्ट जारी केल्याच्या पार्श्वभूमीवर नदीकाठच्या गावांतील वस्तीतील नागरिकांनी सतर्क राहावे, असा इशारा अहिल्यानगर पाटबंधारे विभागाने दिला आहे. धरणातील पाणीसाठा व नदीपात्रातील पाण्याचा आवक लक्षात घेऊन आवश्यक ती खबरदारी घेण्याचे आवाहन कार्यकारी अभियंता स्वप्नील काळे यांनी केले आहे. भारतीय हवामान विभागाने जिल्ह्यात मुसळधार पाऊस व ढगफुटीची शक्यता व्यक्त केली असून त्यानुसार रेड अलर्ट जारी करण्यात आला आहे. सध्या धरण पाणलोट क्षेत्रात समाधानकारक पाऊस सुरू असून धरणांमध्ये पूर्ण क्षमतेने पाण्याची आवक होत आहे. त्यामुळे नदीपात्रातील पाण्याच्या प्रवाहात वाढ होण्याची शक्यता लक्षात घेण्यात आली आहे. या पार्श्वभूमीवर धरणस्थळांच्या खालील प्रवरा नदीकाठच्या गावांतील वस्तीतील नागरिकांनी सतर्क राहून प्रशासनाच्या सूचनांचे पालन करावे, असे आवाहन पाटबंधारे विभागाने केले आहे.

# राममंदिर देणगी गैरव्यवहार प्रकरणी दोषींवर कठोर कारवाई करावी - कोषाध्यक्ष गोविंद देवगिरी महाराज

युवावार्ता (प्रतिनिधी)-

श्रीरामपूर - अयोध्येतील श्रीराम जन्मभूमी मंदिरातील भक्तांनी अर्पण केलेल्या देणगीच्या मोजणीदरम्यान झालेल्या कथित आर्थिक गैरव्यवहारामुळे देशभरातील रामभक्तांमध्ये तीव्र नाराजी व्यक्त होत आहे. या पार्श्वभूमीवर श्रीराम जन्मभूमी तीर्थक्षेत्र न्यासाचे कोषाध्यक्ष गोविंददेवगिरी महाराज यांनी निवेदन प्रसिद्ध करून संपूर्ण प्रकरणाची निष्पक्ष चौकशी करून दोषींवर कठोर कारवाई करण्याची मागणी केली आहे.

या निवेदनात त्यांनी म्हटले आहे की, प्रभू श्रीरामाच्या कृपेने अनेक शतकांच्या संघर्षानंतर भव्य राममंदिर उभारण्यात आले. अशा पवित्र ठिकाणी भक्तांनी श्रद्धेने अर्पण केलेल्या देणगीत गैरव्यवहार झाल्याचे समोर येणे अत्यंत वेदनादायी आणि लज्जास्पद आहे. आपण कधीही न्यासातील कोणतेही पद मिळविण्यासाठी प्रयत्न केले नाहीत. प्रभू श्रीरामाची निःस्वार्थ सेवा करण्याची संधी मिळणे हेच आपले भाग्य असल्याचे त्यांनी



नमूद केले. तसेच, अयोध्या दौऱ्यासाठी किंवा न्यासाच्या कामासाठी आजपर्यंत न्यासाकडून प्रवासखर्च किंवा कोणताही आर्थिक लाभ घेतलेला नसल्याचा दावा त्यांनी केला. कोषाध्यक्ष म्हणून न्यासाच्या निधीचे लेखापरीक्षण (ऑडिट) नियमितपणे होत असून सर्व आर्थिक नोंदी अधिकृत तपासणीसाठी उपलब्ध असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. मंदिरातील खर्च थेट बँक व्यवहारांद्वारे केला जातो. कोणतेही रोख होत नसल्याचेही व्यवहार त्यांनी सांगितले. देणगीची मोजणी ज्या विभामात केली जाते, त्या प्रक्रियेशी आपला कोणताही थेट संबंध नसल्याचे त्यांनी स्पष्ट केले. ही प्रक्रिया स्थानिक विश्वस्त आणि संबंधित अधिकाऱ्यांच्या देखरेखीखाली निश्चित नियमांनुसार पार पडते, असेही त्यांनी नमूद केले.

या प्रकरणातील चोरी किती झाली, कधी झाली आणि कशी झाली? याचा तपास सुरू असून, विशेष तपास पथक आणि पोलिसांवर आपला पूर्ण विश्वास असल्याचे त्यांनी सांगितले. दोषी कोणताही असो, त्याच्यावर कायद्यानुसार कठोर शिक्षा व्हावी, अशी मागणी त्यांनी केली.

# राजभवनात जवानाची गोळी झाडून आत्महत्या





मुंबई (वृत्तसंस्था)

मुंबईतील मलबार हिल परिसरात असलेल्या व्हीआयपी आणि अतिसुरक्षित अशा राजभवन परिसरातून एक अत्यंत धक्कादायक आणि खळबळजनक घटना समोर आली आहे. राजभवनात तैनात असलेल्या राज्य राखीव पोलीस दलाच्या एका जवानाने स्वतःवर गोळी झाडून जीवन संपवलं. राजभवनातील एसआरपीएफ कॅम्पमध्ये ही घटना घडली असून यामुळे मुंबई पोलीस आणि प्रशासनात मोठी खळबळ उडाली आहे.

मिळालेल्या प्राथमिक माहितीनुसार, या जवानाने राजभवनात ड्युटीवर असताना स्वतःच्याच सर्व्हिस रायफलने स्वतःवर गोळी झाडून आपलं जीवन संपवलं. या जवानाने असं कृत्य का केली, याचं कारण अद्याप समजू शकलेलं नाही.आत्महत्या करणाऱ्या एसआरपीएफ जवानाचं नाव कौस्तुभ सांगळे असं असून ते पोलीस अंमलदार म्हणून कार्यरत होते. कौस्तुभ सांगळे हे एसआरपीएफ ग्रुप १६, कोल्हापूर येथील तुकडीचे जवान होते. सध्या त्यांची नियुक्ती मुंबईतील राजभवनाच्या सुरक्षेसाठी करण्यात आली होती.

त्यांची राजभवनात ड्युटी सुरू असतानाच अचानक त्यांनी स्वतःच्या रायफलमधून गोळी झाडली. गोळीबाराचा प्रचंड आवाज झाल्यानंतर परिसरातील इतर सुरक्षा कर्मचाऱ्यांनी तात्काळ त्या दिशेने धाव घेतली. मात्र, तोपर्यंत सांगळे यांचा जागीच दुर्दैवी मृत्यू झाला होता. या घटनेची माहिती मिळताच राजभवन परिसरात तणावाचे वातावरण निर्माण झाले.

कौस्तुभ सांगळे यांनी कौटुंबिक वादातून किंवा मानसिक तणावातून हे टोकाचे पाऊल उचलले का? याबाबत पोलीस सध्या कसून चौकशी करत आहेत. घटनास्थळावरून कोणतीही सुसाईड नोट अद्याप जप्त करण्यात आलेली नाही. वरिष्ठ पोलीस अधिकारी राजभवनातील इतर कर्मचाऱ्यांचे आणि जवानांचे जबाब नोंदवत असून या प्रकरणाचा पुढील तपास मलबार हिल पोलीस करत आहेत.

# महाराष्ट्राच्या राजकारणात पुन्हा भूकंपाचे संकेत

मुंबई (वृत्तसंस्था)

राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे काही खासदार आणि आमदार सत्तेत नसल्यामुळे मतदारसंघातील विकासकामांसाठी थेट 'एनडीए'मध्ये जाण्यास उत्सुक असल्याच्या चर्चांनी सध्या राजकीय वर्तुळ ढवळून निघाले आहे. याच पार्श्वभूमीवर, मुंबईतील एका पंचतारांकित हॉटेलमध्ये शरद पवार गटाचे ज्येष्ठ नेते जयंत पाटील आणि भाजपचे राष्ट्रीय सरचिटणीस विनोद तावडे यांच्यात बैठक पार पडल्याची माहिती समोर आली आहे. या नव्या घडामोडींमुळे महाराष्ट्राच्या राजकारणाला पुन्हा एकदा कलाटणी मिळण्याचे संकेत असून, ठाकरे गटाला महाविकास आघाडीत एकाकी पाडण्याची ही शरद पवारांची नवी खेळी असल्याची चर्चा आता रंगू लागली आहे.

सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, या बैठकीत 'राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्ष' जर महायुतीमध्ये अधिकृतपणे सहभागी झाला, तर त्यांच्या वाट्याला सत्तेत नेमके काय येऊ शकते? यावर दोन्ही नेत्यांमध्ये सविस्तर खल झाला. इतकेच नव्हे तर, महायुतीत थेट सामील न होता केवळ बाहेरून पाठिंबा देण्याच्या पर्यायावरही तावडे आणि पाटील यांच्यात चाचपणी झाल्याचे समजते. सत्तेसाठी सोयीचे राजकारण साधत उद्धव ठाकरे यांच्या शिवसेना गटाला महाविकास आघाडीत एकाकी पाडण्याचा हा शरद पवारांचा नवा डाव असल्याचे मत राजकीय जाणकारांनी व्यक्त केले आहे. तावडे यांच्याशी झालेल्या या दीर्घ चर्चेनंतर जयंत पाटील यांनी आपल्या पक्षाच्या इतर ज्येष्ठ नेत्यांशीही संपर्क साधून पुढील रणनीतीबाबत संवाद साधल्याची माहिती समोर आली आहे.

काही दिवसांपूर्वीच राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाचे माजी मंत्री, आमदार धर्मरावबाबा आत्राम यांनी नागपुरात माध्यमांशी बोलताना शरद पवार यांच्या राष्ट्रवादीचे किमान ५ खासदार आमच्या पक्षात (राष्ट्रवादी अजित पवार गट) येऊ शकतात. येत्या १२ डिसेंबरपर्यंत या खासदारांचा प्रवेश सोहळा होऊ शकतो असे म्हटले होते. राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार गट) एनडीएमध्ये जाणार असल्याच्या चर्चांबाबत विचारले असता रोहित पवार यांनी त्या सर्व चर्चा फेटाळून लावल्या. पक्षात किंवा केंद्रातील कोणत्याही नेत्यांसोबत अशा प्रकारची कोणतीही चर्चा सुरू नसल्याचे त्यांनी स्पष्ट केले. आम्ही विरोधी पक्ष म्हणून सामान्य जनता, शेतकरी, विद्यार्थी आणि कष्टकऱ्यांचे प्रश्न मांडत राहू, असे ते म्हणाले.

विजय वडेट्टीवार म्हणाले, चर्चा करण्याला अर्थ नाही. पण चर्चा सुरू आहे एवढे मात्र नक्की आहे. आता त्यांना कोणता रस्ता सोयीस्कर ठरतो हे त्यांनी ठरवायचे आहे.

# पांडुरंग दर्शनाची आस...

महाराष्ट्रामधून संतांच्या पालख्या पंढरीकडे निघाल्या आहेत. कालच संत श्रेष्ठ श्री. निवृत्ती महाराज यांच्या पालखी सोहळ्यामध्ये सहभागी होण्याचे भाग्य लाभले.पायी दिंडीमधे सहभागी असणाऱ्या सर्व वारकऱ्यांमधे प्रचंड उत्साह होता.पाऊस आणि वारे यांची पर्वा न करता काही जण अभंग, काही फुगड्या खेळत होते. हरिनामाचा गजर सारखा सुरू होता.प्रत्येकाच्या मनात एकच ध्यास होता, परब्रह्म पांडुरंगाचे दर्शन घेणे. संत ज्ञानेश्वर आणि संत तुकाराम महाराज यांच्याही पालख्या आता निघणार आहेत. या पंढरीच्या वाटेवर संतांनी विचार रूपी अमृताचा सडा शिंपला आहे.वारीचे व्यवस्थापन हे जगातील सर्वोच्च व्यवस्थापन आहे. आपल्या वारकरी बंधू भगिनींनी अध्यात्म आणि विज्ञान यांची सांगड घातली आहे.दिंडी मधील जेष्ठ वारकरी वॉकी टॉकीवर पुढच्यांना सुचना देतात.मोबाईल वर सुद्धा सतत संपर्क असतो. वारी मध्ये शारीरिक, बौद्धिक आणि मानसिक व्यायाम होतो.इथे कोणी कोणाला निमंत्रण देत नाही, आग्रह नसतो. सर्व गोष्टी ठरलेल्या वेळेनुसार आणि तारखेनुसार होतात. प्रत्येक वारकऱ्यांमध्ये स्वयंशिस्त असते. आपल्याला आपला वर्तमान आनंदमय आणि रमणीय करायचा असेल तर खरोखर दिंडी सोहळ्यामध्ये आनंद घेतला पाहिजे. ही पंढरीची वारी रामकृष्ण हरी मंत्र देई. प्रत्येकाच्या तोंडी राम कृष्ण हरी. माऊली राम कृष्ण हरी. पालखी सोहळ्यामध्ये आपल्याला शुभदर्शन होते ,शुभ कथन होते, शुभश्रवण होते आणि शुभचिंतन होते. पंढरीचा पांडुरंग म्हणजेच विठ्ठल. २८ युगे परब्रह्म पांडुरंग उभे आहेत. सत्ययुग, त्रेतायुग , द्वापार युग ,कलियुग असे चार युगांचे एक चक्र म्हणजे एक फेरा होता सध्या पृथ्वी तत्वाचा सातवा फेरा चालू आहे म्हणून सात गुणिले चार बरोबर २८ होतात. म्हणून सध्या २८वे वश युग चालू आहे. चार वेद १८पुराणे, सहा शास्त्रे



यांची बेरीज २८होते. पंढरीला पायी जाऊन वारकरी आपला कर्मयोग विठ्ठलाच्या चरणी अर्पण करतात. आषाढी एकादशीला किंवा कार्तिकी एकादशीला विठ्ठलाचे दर्शन घेऊन कपाळी बुक्का लावून समस्त वारकरी धन्य होतात. संत लोकांनी आपल्याला नामाचा महिमा सांगितला. घेता नाम विठ्ठलाचे जळती पर्वत पापांचे. आपण दिवसभरामध्ये सुमारे दहा हजार वेळा श्वास घेतो. आपला प्रत्येक श्वास हाच विठ्ठल आहे. प्रत्येक श्वासाबरोबर जर विठ्ठलाचे नाव घेतले तर इतर जप जाप्य करण्याची गरज नाही. आपण सर्व संतांच्या पालख्या उचलतो, तो आपला अत्यंत अभिमानाचा क्षण असतो. कारण या संतांनीच आपल्याला जगण्याचा एक सुंदर मार्ग सांगितला आहे. हा पालखी सोहळा म्हणजेच एक सांस्कृतिक ठेवा आहे. या भक्तीच्या वाटेवरून संत ज्ञानेश्वर माऊली, संत नामदेव, संत एकनाथ ,संत तुकाराम महाराज, संत चोखामेळा, संत गोरोबा, संत सेना महाराज ,संत निळोबाराय सर्वच संत गेले. त्यांची पावले याच भक्तीमय वाटेवर पडली. जगाच्या पाठीवर असा सांस्कृतिक, शिस्तबद्ध, उत्कृष्ट व्यवस्थापन असलेला सोहळा कुठेच नाही. संत मंडळींनी दिलेला उपदेश केलेले मार्गदर्शन दाखवलेली पंढरीची वाट त्यावर शिंपडलेला अमृताचा सडा आणि मुखामध्ये हरिनाम हे सर्व आपल्या संस्कृतीचे रत्न आहेत. हे आपण आपल्या नवीन पिढीपर्यंत नेले पाहिजे. त्यांना पालखी सोहळा, वारी समजून सांगितले पाहिजे. पालखी सोहळ्यानिमित्त शब्दप्रपंच.

**प्रा. शशांक गंधे**
**मो.नं. ९८९०१६३६४२**




पाईल्सचा कायमचा उपाय !
वेदना, रक्तस्त्राव, जळजळ?
आता सुरक्षित आणि सोप उपचार उपलब्ध
पाईल्स (PILES) | फिशर (FISSURE) | फिस्टुला (FISTULA)
फोन नं. ०२४२५-२२००५०
संपर्क - 7219100100
ताम्हाणे हॉस्पिटल
आधुनिक उपचार पद्धती
- कमी वेदना, जलद बरे होणे
- लेझर व प्रगत तंत्रज्ञान
- अनुभवी जज्ञ डॉक्टरांचा सल्ला
- गोपनीयतेची पूर्ण काळजी
सुरक्षित उपचार | अनुभवी टीम | लवकर आराम | आपली सेवा आमची बांधिलकी
पत्ता - इंदिरानगर, गल्ली नं. १०, विठ्ठल मंदिराजवळ, अकोले बायपास रोड, संगमनेर

दैनिक युवावार्ता
Web : www.yuvavarta.in/com
Mail : dailyyuvavarta@gmail.com
परिवर्तनाचा पुरस्कर्ता

आपल्या व्यवसायाची जाहीरात येथे प्रसिद्ध करा
संपर्क
८८३०५०८२४४ ८३८०९५६६०४
७६२०३८८२३०



SALE 25 TO 50* % OFF

लग्नबस्त्यासाठी खास व्यवस्था...
भंडारी
क्लॉथ सेंटर सिल्क ॲण्ड सारीज
मनासारखी खरेदी आणि भरपुर फायदा देणारा सेल
(संपूर्ण ए.सी. शोरुम)
मेनरोड कॉर्नर, बाजारपेठ, संगमनेर

# लायन्स संगमनेर सॅफ्रॉन सफायरचा २१ वा पदग्रहण सोहळा उत्साहात

## जितेश लोढा अध्यक्ष, नम्रता अभंग सचिव तर चंद्रशेखर गाडे खजिनदारपदी विराजमान

युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर - समाजसेवा, नेतृत्व आणि मानवतेची अखंड परंपरा जपत कार्यरत असलेल्या आणि जगातील सर्वांत मोठा क्लब असलेल्या लायन्स क्लब ऑफ संगमनेर सॅफ्रॉन सफायरच्या २१ व्या पदग्रहण व शपथविधी सोहळ्याचा दिमाखदार कार्यक्रम नुकताच मालपाणी लॉन्स, संगमनेर येथे उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाला. या सोहळ्यात जितेश लोढा यांनी अध्यक्ष, नम्रता अभंग यांनी सचिव तर चंद्रशेखर गाडे यांनी खजिनदार पदाची सूत्रे स्वीकारली.

या पदग्रहण सोहळ्यास पदग्रहण अधिकारी म्हणून माजी अध्यक्ष श्रीनिवासजी भंडारी, प्रमुख अतिथी म्हणून सेकंड व्हीडीजी एमजेएफ सुनिताजी मालपाणी, माजी मल्टिपल कौन्सिल चेअरपर्सन एमजेएफ गिरीशजी मालपाणी, रिजन चेअरमन संदीप गोंदकर तसेच झोन चेअरपर्सन चेतन भुतडा यांची प्रमुख उपस्थिती लाभली. कार्यक्रमाची सुरुवात गणेशपूजन, ध्वजवंदन आणि राष्ट्रगीताने झाली. कार्यक्रमाचे संयोजक आणि माजी अध्यक्ष अतुल अभंग यांनी उपस्थितांचे स्वागत केले. त्यानंतर मान्यवरांचा सत्कार करण्यात आला. अध्यक्षीय मनोगतात ड. कल्याण कासट यांनी आपल्या कार्यकाळातील उपक्रमांचा आढावा घेतला. आपल्या कार्यकाळात क्लबला बेस्ट लायन्स क्लबचा किताब मिळाला ही बाब अभिमानाची असल्याचे त्यांनी सांगितले. सर्व सदस्य, पदाधिकारी आणि मार्गदर्शकांचे सहकार्याबद्दल कासट यांनी आभार व्यक्त केले. यानंतर माजी अध्यक्षा मिना मणियार यांच्या मार्गदर्शनाखाली नूतन सदस्यांचा दीक्षा समारंभ पार पडला. ३० नूतन सदस्यांनी



यावेळी शपथ घेतली. पदग्रहण अधिकारी श्रीनिवास भंडारी यांनी नूतन पदाधिकाऱ्यांना शपथ देत लायनिझमची मूल्ये, सामाजिक उत्तरदायित्व आणि नेतृत्वाची जाणीव करून दिली. आपल्या मार्गदर्शनात त्यांनी सेवा, समर्पण आणि संघभावना या त्रिसूत्रीवर कार्य करण्याचे आवाहन केले. ज्या क्लबच्या स्थापनेपासून आपण कार्यरत आहोत त्याच क्लबचा पदग्रहण अधिकारी होणे ही माझ्यासाठी आनंदाची बाब असल्याचे त्यांनी सांगितले.

एमजेएफ सुनिता मालपाणी यांनी लायन्स चळवळीचे व्यापक कार्य, समाजोपयोगी उपक्रमांची आवश्यकता, सॅफ्रॉन सफायरच्या कार्याचा आढावा घेतला. नवसदस्यांना टूर दी फ्रान्स चे उदाहरण देऊन प्रत्येकाने आपल्या कामात १% वाढ केली तर क्लब मोठ्या उंचीवर जाईल असे प्रतिपादन त्यांनी केले. गिरीश मालपाणी यांनी लायन्सच्या सेवाभावी परंपरेचा गौरव करत समाजाच्या प्रत्येक घटकापर्यंत सेवा पोहोचविण्याचा संदेश दिला. प्रत्येकाच्या जीवनात संघर्ष असतो आणि संघर्ष असेल तर यश मिळविण्याचा आनंद अधिक असल्याचे त्यांनी सांगितले. नूतन अध्यक्ष जितेश लोढा संघर्षमय जीवनातून पुढे आले असून ते आणि त्यांची टीम अधिक जोमाने काम करतील असेही त्यांनी सांगितले. रिजन चेअरमन संदीप गोंदकर व झोन चेअरपर्सन चेतन भुतडा यांनीही नूतन पदाधिकाऱ्यांना शुभेच्छा देत

**यावेळी लायन्स क्लब संगमनेर सॅफ्रॉनच्या वतीने जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, कोटकर वस्ती, देवगाव यांना संगणक प्रदान करण्यात आला. शिक्षक आणि विद्यार्थी प्रतिनिधींनी सदर संगणकाचा स्वीकार केला.**

आगामी वर्षासाठी विविध सेवाभिमुख प्रकल्प राबविण्याचे आवाहन केले. यावेळी नूतन अध्यक्ष जितेश लोढा यांचा परिचय स्वाती लोढा यांनी करून दिला. आपल्या मनोगतात अध्यक्ष जितेश लोढा यांनी शिक्षण, आरोग्य, पर्यावरण, रक्तदान, वृक्षारोपण, गरजू विद्यार्थ्यांना मदत, महिला सक्षमीकरण आणि समाजहिताचे विविध नाविन्यपूर्ण प्रकल्प राबविण्याचा संकल्प व्यक्त केला. प्रत्येक सदस्याला सोबत घेऊन सॅफ्रॉन सफायरच्या सेवाकार्याची परंपरा अधिक समृद्ध करण्यासाठी कटिबद्ध असल्याचे त्यांनी सांगितले. या प्रसंगी विविध क्षेत्रातील मान्यवर, माजी अध्यक्ष, लायन्स परिवारातील सदस्य तसेच संगमनेर व परिसरातील विविध लायन्स क्लबचे पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. संपूर्ण कार्यक्रमाचे प्रभावी सूत्रसंचालन सम्राट भंडारी आणि रितीका भंडारी यांनी केले. कार्यक्रमाच्या शेवटी नम्रता अभंग यांनी उपस्थितांचे आभार मानले. थश डशीींश या लायन्सच्या ब्रीदवाक्याला साजेसा, सेवा, नेतृत्व आणि सामाजिक बांधिलकीचा संदेश देणारा हा पदग्रहण सोहळा सर्व उपस्थितांच्या स्मरणात राहणारा ठरला.

सहकारमहर्षी भाऊसाहेब थोरात अमृतवाहिनी सह. बँक लि. घुलेवाडी

आर्थिक अडचण आहे का?
काळजी करु नका !
सोनेतारण कर्ज
कमीत कमी व्याजदर
जास्तीत जास्त कर्ज
SMBT BANK
बँकेच्या विविध सेवा सुविधांच्या अधिक माहितीसाठी आजच आपल्या जवळच्या शाखेशी संपर्क साधावा.
* कर्ज रक्कम वाढ । * कर्ज व्याजदर कमी । * कमीत कमी कागदपत्रे
सेवा सुविधांच्या अधिक माहितीसाठी जवळच्या शाखेशी संपर्क साधा
- शाखा - घुलेवाडी (मुख्यशाखा), मार्केट यार्ड, इंजि. कॉलेज विस्तार कक्ष, मेनरोड, तळेगाव, साकूर, घारगाव, आश्वी बु।।, संगमनेर खुर्द, निमोण, राहाता

# श्री स्वामी समर्थ कॉम्प्युटर विद्यार्थ्यांचा राज्यस्तरीय गुणगौरव

युवावार्ता (प्रतिनिधी)

राजापूर - श्री स्वामी समर्थ कॉम्प्युटर सेंटर (एमकेसीएल ऑथोराइज्ड लर्निंग सेंटर), राजापूरच्या १५ विद्यार्थ्यांनी स्पर्धा परीक्षांच्या क्षेत्रात उल्लेखनीय यश संपादन करत राज्यस्तरीय पातळीवर मानाचा सन्मान मिळविला आहे. छत्रपती शाहू महाराज संशोधन, प्रशिक्षण व मानव विकास संस्था (सारथी), पुणे यांच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या भव्य गुणगौरव सोहळ्यात या विद्यार्थ्यांचा आणि त्यांच्या पालकांचा गौरव करण्यात आला.

शुक्रवार, दि. २६ जून २०२६ रोजी पुण्यातील गणेश कला व क्रीडा मंच, स्वारगेट येथे सारथीच्या प्रथम बॅचमधील यशस्वी विद्यार्थी व पालक गुणगौरव सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते. या सोहळ्यास मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री सुनेत्राताई पवार, उच्च व तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांत दादा पाटील यांच्यासह पुणे महानगरपालिकेचे पदाधिकारी आणि विविध क्षेत्रांतील मान्यवर उपस्थित होते.

सारथी संस्थेच्या विविध योजनांद्वारे एमपीएससी, यूपीएससी तसेच इतर स्पर्धा परीक्षांमध्ये यश मिळवलेल्या विद्यार्थ्यांचा आणि त्यांच्या पालकांचा यावेळी सन्मान करण्यात आला. राज्यभरातून सुमारे तीन ते चार हजार विद्यार्थी व पालक या प्रेरणादायी कार्यक्रमाला उपस्थित होते.


श्री स्वामी समर्थ कॉम्प्युटर सेंटरच्या संचालिका सौ. ज्योती तुकाराम हासे आणि जिल्हा समन्वयक गणेश आठरे यांच्या मार्गदर्शनामुळे विद्यार्थ्यांना हे यश मिळाल्याचे सांगण्यात आले. विद्यार्थ्यांना गुणवत्तापूर्ण मार्गदर्शन देण्याचा आमचा सातत्याने प्रयत्न राहिला असून, या यशामुळे आमच्या कार्याला



मिळालेली ही मोठी पावती आहे. भविष्यातही विद्यार्थ्यांना सर्वोत्तम मार्गदर्शन देण्यासाठी आम्ही कटिबद्ध आहोत अशी भावना त्यांनी व्यक्त केली. या सोहळ्यात पूजा संतोष गुंजाळ, निकिता देवराम हासे, देवराज तुकाराम हासे, प्रतीक कैलास हासे, प्रथमेश संभाजी गुंजाळ, दिशा चंद्रभान हासे, संगम गणपत हासे, मयूर संजय हासे, गोवर्धन शरद हासे, विशाल शरद गुंजाळ, स्नेहल दत्तात्रय सोनवणे, पूजा सोमनाथ हासे, प्रतीक सुनील आवारी, जतीन विलास भोकनळ आणि उज्वला गोकुळ हासे या १५ विद्यार्थ्यांचा विशेष सन्मान करण्यात आला. या यशाबद्दल सर्व विद्यार्थ्यांचे सर्व स्तरांतून अभिनंदन होत असून त्यांच्या उज्ज्वल भविष्यासाठी शुभेच्छांचा वर्षाव होत आहे.

नोकरीची सुवर्णसंधी
'इन्वोफिक्स सोल्यूशन प्रायव्हेट लिमिटेड'
(सौर ऊर्जा कंपनी) या कंपनीस रायगड, रत्नागिरी व सिंधुदुर्ग जिल्ह्यांसाठी खालील पदांसाठी उमेदवारांची आवश्यकता आहे
पदे: Field Sales Executive
Business Development Manager
कार्य क्षेत्र : रायगड । रत्नागिरी । सिंधुदुर्ग
पात्रता
* कोणत्याही शाखेतील पदवीधर
* विक्री व मार्केटिंग क्षेत्रातील अनुभवास प्राधान्य
* उत्तम संवाद कौशल्य व प्रवासाची तयारी आवश्यक
* स्वतःची दुचाकी, वैध ड्रायव्हिंग लायसन्स असणे आवश्यक
सुविधा
आकर्षक वेतन, प्रोत्साहनपर इन्सेंटीव्ह, पेट्रोल भत्ता, वैद्यकीय विमा, पीएफ सुविधा
संपर्क - RSM (Raigad): 7030334196
HR Head : 7030334165




अविवाहितांच्या, नवविवाहितांच्या, चाळीशीनंतरच्या स्त्री-पुरूषांच्या तसेच मधुमेही व व्यसनाधिनांच्या
सेक्स समस्या
हस्तमैथुनाचे दुष्परिणाम/स्वप्नदोष/धातुपात
शीघ्रपतन/असमाधान/कमजोरी/ शुक्राणुंची कमी
गुप्तरोग/ त्वचारोग/ नपुंसकत्व/ मानसिक नैराश्य

जर्मनमेड होमिओपॅथिक औषधे-शास्त्रोक्त मार्गदर्शन

डॉ. अभय मुथा (मनोलैंगिक विकार तज्ञ)
B.H.M.S., M.D.(A.M), M.D.(Acu)., P.G.(SEXOLOGY)
३० वर्षांचा प्रदीर्घ अनुभव (राष्ट्रीय पुरस्कार प्राप्त)
अत्याधुनिक मशिनच्या सहाय्याने तपासणी करून औषधोपचार
(प्रत्येक नवीन रूग्णासाठी १ तास वेळ दिला जातो) ऑपॉईंटमेंट आवश्यक
१ लाखांहून अधिक रूग्णांवर यशस्वी उपचार
ISO मानांकन प्राप्त
सेक्स सुपर स्पेशालिटी होमिओपॅथिक क्लिनिक
विनायकनगर, नगर-पुणे रोड, अहिल्यानगर
www.sextreatment.in
94 22 23 90 13

स्वास्थ्य रक्षणाय् रोग परिशमनाय्
कुटे हॉस्पिटल ॲंड लॅप्रोस्कोपी सेंटर
डॉ. सोनाली प्र. कुटे (M.B.B.S.) Physician & Anasthhetist
डॉ. प्रदीप भाऊसाहेब कुटे (M.S.) Laproscopic Surgeon & Endoscopist
डॉ. निखील रहांगडाले Orthosurgeon
डॉ. सुनिल दिघे Cardiologist
डॉ. फैमुद्दीन शेख Medicine
• सर्जरी विभाग • डायलिसीस विभाग • हृदयरोग विभाग • जॉईंट रिप्लेसमेंट
• अतिदक्षता विभाग • सुपर स्पेशालिटी विभाग • मेडिसीन विभाग • स्पाईन सर्जरी
• अपघात विभाग • न्यूरोविभाग • अद्ययावत कॅथलॅब • मॉड्युलर ऑपरेशन थिएटर
सर्व मेडिक्लेम व कॅशलेस सुविधा
पंतप्रधान व महात्मा ज्योतिराव फुले जनआरोग्य योजना
ॲम्ब्युलन्स व २४ तास अत्यावश्यक सेवा
8888882225
४० फुटी डीपी रोड, ताजणे मळा, नवीन नगर रोड, संगमनेर
(०२४२५) २२६६८८, २२६६८६

दैनिक युवावार्ता हे दैनिक, सौ. सुशीला किसन हासे, प्लॉट नं. ४/ब, सावतामाळी नगर, बी.एड्. कॉलेज रोड, संगमनेर–४२२६०५, जि. अ.नगर (महाराष्ट्र) यांनी आनंद प्रिंटर्स, प्लॉट नं. ४/ब, सावतामाळी नगर, बी.एड्.कॉलेज रोड, संगमनेर – ४२२६०५ जि. अहमदनगर (महाराष्ट्र) येथे छापून त्याच ठिकाणी प्रकाशित केले. संपादक सौ. सुशीला किसन हासे, मुद्रक, आनंद प्रिंटर्स, (सुशीला किसन हासे), फोन (०२४२५)२२५१२९. या अंकात प्रसिध्द झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक, संचालक सहमत असतीलच असे नाही. (संगमनेर न्यायकक्षेत) Email - dailyyuvavarta@gmail.com, RNI No. MAHMAR/2007/24252 पोस्टाचा परवाना क्रं. BII/RNP/SRP/25/2023-25